RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१६७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२७ जुलै २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मराठा-ओबीसी आमनेसामने समाजात कुणी फूट पाडली?

### शरद पवारांचं 'या संघर्षावर' सडेतोड भाष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

आत्ताची जी महाराष्ट्राची परिस्थिती आहे त्याबद्दल अस्वस्थता वाटते का ? या प्रश्नावर शरद पवार म्हणाले, आत्ताची जी स्थिती आहे विशेषत: काही जिल्ह्यांची. त्यामध्ये जालना, बीड परभणी या जिल्ह्यांमध्ये वातावरण अत्यंत अस्वस्थ आहे. लोकसभेच अधिवेशन संपल्यावर मी त्या लोकांशी जाऊन भेटणार आहे.त्यांना बोलणार आहे असं पवार यावेळी म्हणाले. ते एबीपी माझाच्या महामाझा कट्टा या कार्यक्रमात बोलत होते.

महाराष्ट्रात जो काही वाढता भ्रष्टाचार आहे, छोट्या छोट्या गोष्टींवरून जी अस्ताव्यस्तता झाली आहे त्यावर आपल्याला काय वाटत अस विचारल्यावर पवार म्हणाले, यातील कारण काय आहेत हे नाही सांगता येणार.



पण, ज्यांच्यावर जबाबदारी आहे, ज्यांच्यावर बांधिलकी आहे ते कमी पडले असं वाटतय. तसंच, हे जरी खरं असल तरी महाराष्ट्रामध्ये फार मोठा वर्ग असा आहे जो या सर्व गोष्टींना यत्किंचितही समर्थन देत नाही असंही पवार यावेळी म्हणाले आहेत. हे दुरुस्त झालं पाहिजे त्यासाठी कष्ट करण्याचीही या लोकांची तयारी आहे, ही जमेची बाजू असंही ते म्हणाले आहेत.

तुमची आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट झाली या प्रश्नावर शरद पवार म्हणाले, सर्वात महत्वाचं म्हणजे तुम्ही जास्तीत जास्त संवाद ठेवला पाहिजे. आज संवाद संपलेला आहे. सार्वजनिक किंवा राजकीय जीवनात जेव्हा संवाद थांबतो तेव्हा चुकीच्या समजुती वाढत जात असतात. त्यामुळे संवाद जास्त गरजेचा आहे आणि त्यासाठी आमच्यासारख्या लोकांनी लक्ष द्यायला हव असंही पवार यावेळी म्हणाले आहेत. तसंच, मी कधीही महाराष्ट्रत असं ऐकलं नाही की एका समाजाच हॉटेल असेल तर दुसऱ्या समाजाचे लोक तिथे चहा घ्यायलाही जात नाहीत. हे भयावह चित्र आहे. ते बदललं पाहिजे. लोकांमध्ये विश्वास वाढला पाहिजे, आणि अशा प्रसंगात आमच्यासारख्या लोकांनी जीव ओतून काम केलं पाहिजे असंही पवार यावेळी म्हणाले.तुमची भूमिका काय यावर पवार म्हणाले, यामध्ये असं आहे की पहिल्यांदाच दुर्दैवाने दोन वेगळे वर्ग पडले आहेत. आणि त्या वर्गांना कुणी काही तरी सांगितलं आहे. तसंच, आजचे जे राज्यकर्ते आहेत त्यांनी वेगळ्या दोन भूमिका घेतल्या आहेत असा थेट आरोपच पवारांनी यावेळी केला आहे. यामध्ये एका गटाने मराठा आंदोलकांची बाजू घेतली तर दुसऱ्या गटाने ओबीसी आंदोलकांची बाजू घेतली आहे. हे योग्य नाही. आपण समंजस्य कस निर्माण करू शकतो यावर लक्ष देण गरजेचं आहे असंही पवार म्हणाले आहेत.

## ट्रान्सपोर्ट नगर येथील टायर गोडाऊनमध्ये भीषण आग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

अमरावती शहरातील ट्रान्सपोर्ट नगर येथील टायर गोडाऊन मध्ये आज दुपारच्या सुमारास भीषण आग लागल्याने चांगलीच खळबळ उडाली वलगांव रोड वरील ताज पैलेस च्या मागे हे टायर चे गोडवून आहे. ही आग नेमकी कश्या मुळे लागली याच कारण अद्याप समोर आले नसले तरी हि आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन विभागाचे पथक अथक परिश्रम घेत आहे. या आगीचे काळे शार लोळ हे तीन किलोमीटर दूर पासून दिसून येत होते. या आगीमुळे संपूर्ण परिसरात अंधार पसरलेला होता.अर्धा ते एक तासापासून हि आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. जावेदभाई लोहावाले नामक व्यक्तीचे हे गोडावून असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.या आगीमध्ये मात्र जावेदभाई लोहावाले यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

## लाडकी बहीण योजनेच्या संभ्रमावर आदिती तटकरेंनी दिली नवी माहिती, वेगवेगळ्या दाव्यांना पूर्णविराम!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

सध्या राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सर्वत्र चर्चा होत आहे. आतापर्यंत राज्यभरातील साधारण एक कोटीपेक्षा अधिक महिलांनी या योजनेसाठी अर्ज दाखल केला आहे. राज्य सरकारकडून या योजनेचा पूर्ण ताकदीने प्रचार केला जातोय. दरम्यान, एकीकडे राज्य सरकारची ही एक अभिनव योजना असल्याचे सांगितले जात असतानाच सरकारच्याच अर्थ विभागाने या योजनेवर अनेक आक्षेप घेतले आहेत. अर्थ विभागाने या योजनेला विरोध केल्याचं म्हटलं जातंय. त्यानंतर विरोधक पुन्हा एकदा आक्रमक झाले असून राज्य सरकारवर टीका केली जात आहे. यावरच महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अर्थ विभागाचे कोणतेही आक्षेप नाहीत, असं त्यांनी सांगितलंय.




### अर्थ विभागाचे नेमके आक्षेप काय?

मिळालेल्या माहितीनुसार अर्थ विभागाने आकडेवारी मांडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर काही आक्षेप घेतले आहेत. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ४६ हजार कोटी रुपये कुठूण आणायचे? या संदर्भातील तरतूद कशी करायची? राज्यावर ६.८ लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना ही योजना आणणे कितपत योग्य आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा होण्याआधीच या योजनेसाठी एकूण ४६७७ कोटी रुपये मंजूर कसे करण्यात आले, असे अनेक प्रश्न अर्थ विभागाने उपस्थित केले आहेत.

आदिती तटकरे यांनी एक्स या समाजमाध्यमाच्या मदतीने लाडकी बहीण योजनेबाबत भाष्य केलंय. विभागाची मंत्री म्हणून जबाबदारीने सर्व प्रसारमाध्यमांना सांगू इच्छित आहे की, असे कोणतेही आक्षेप उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार आणि अर्थ विभागाने योजना जाहीर केल्यानंतर घेतले नाहीत. महिला सक्षमीकरणाचा दृष्टीकोन डोळ्यांसमोर ठेवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन आणि योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या निधीची पूर्तता करुन ही योजना सुरू केली आहे, असे आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले.

## सोशल मीडियावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांविरोधात आक्षेपार्ह पोट्स, गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**

'एक्स'वर (अगोदरचे ट्वीटर) राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या खातेधारकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका वकिलाने केलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



संबंधित खात्यावरून फडणवीस व भाजपच्या नेत्यांच्या फोटोंना मॉर्फ करून चुकीचे नॅरेटीव्ह पसरविण्याचा प्रयत्न सुरू होता.

'एक्स'वर गजाभाऊ नावाने संबंधित खाते सुरू आहे. या खात्यावर देवेंद्र फडणवीस यांचे फोटो मॉर्फ करत कधी मुघल तर कधी तांत्रिक दाखविण्यात आले आहे. त्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आक्षेपार्ह पोस्ट करण्यात आले आहेत. यासंदर्भात नागपुरातील वकील परिक्षित गजानन मोहिते यांनी सिताबर्डी पोलीस ठाण्यात तक्रार केली. संबंधित पोस्ट या अतिशय खालच्या पातळीच्या असून त्या माध्यमातून समाजात भ्रम पसरविण्याचा प्रयत्न सुरू आहे. धार्मिक व सामाजिक मुद्द्यांबाबत संभ्रमित करणाऱ्या पोस्ट टाकून संबंधित खातेधारकाने राज्यातील शांतता व सुव्यवस्था भंग करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची शहानिशा करून सिताबर्डी पोलीस ठाण्यात संबंधित खातेधारकाविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२, ३५३ (१)(सी), ३३६(४) व ३५८(२)(सी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पंतप्रधानांचेदेखील मॉर्फ फोटो

संबंधित खातेधारकाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे फोटोदेखील मॉर्फ करून पोस्ट केले आहेत. एका चित्रपट अभिनेत्याच्या चेहऱ्याऐवजी पंतप्रधानांचा फोटो लावण्यात आला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे गुन्हा दाखल झाल्यावरदेखील शुक्रवारी उशीरापर्यंत संबंधित एक्स खाते सक्रिय होते. त्यातील एकही पोस्ट डिलिट झालेली नव्हती.

## केदारनाथ मंदिराच्या गर्भगृहात लावलेलं २३ किलो सोनं गेलं कुठे? अखेर मंदिर समितीनं दिलं उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ केदारनाथ**

सध्या उत्तराखंडमधील केदारनाथ मंदिराच्या गर्भगृहाला सुवर्णजडित करण्यासाठी वापरण्यात आलेल्या सोन्याचा मुद्दा वादाचं केंद्र बनलेला आहे. शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला असतानाच, केदारनाथमध्ये लावलेलं २३ किलो सोनं गेलं कुठं, असा प्रश्न कॉँग्रेसकडूनही उपस्थित करण्यात येत होता. तसेच गर्भगृहात लावलेलं सोनं काळवंडलं कसं, असा प्रश्नही कॉँग्रेसकडून उपस्थित केला गेला होता. अखेर या सर्व वादावर मंदिर समितीने पुढे येत उत्तर दिलं आहे.



२०२२ मध्ये केदारनाथ मंदिराचं गर्भगृह सुवर्णजडित करण्यात आलं होतं. तेव्हापासून येथील सोन्यावरून वाद सुरू आहे. आता मंदिर समितीने समोर येत सर्व पावती पुराव्यांसह आपलं म्हणणं मांडलं आहे. मंदिर समितीने सांगितलं की, केदारनाथ मंदिराच्या गर्भगृहाला सुवर्णजडित करण्यासाठी २३ किलो ७७७.८०० ग्रॅम सोन्याचा वापर करण्यात आला होता. त्याची बाजारातील किंमत १४ कोटी ३८ लाख रुपये एवढी आहे. तसेच या कामामध्ये एक हजार किलोग्रॅम वजनाच्या कॉपर प्लेटचाही वापर करण्यात आला. त्याची किंमत २९ लाख रुपये एवढी आहे.

मंदिर समितीच्या सीईओंनी सांगितलं की, गर्भगृहाला सुवर्णजडित करण्यासाठीचं कार्य दात्याने स्वत: वैयक्तिकरीत्या पूर्ण केले. या दात्याने ज्वेलर्सकडून तांब्याच्या प्लेट तयार करून घेतल्या. त्यानंतर त्यावर सोन्याचा पत्रा लावला. त्यानंतर ज्वेलर्सच्या माध्यमातूनच या प्लेट मंदिराच्या गर्भगृहामध्ये स्थापिन केल्या. यासाठी लागणाऱ्या सुवर्णखरेदीपासून ते मंदिरात ते स्थापित करण्यापर्यंतचं सगळं काम दात्याने आपल्या पातळीवर स्वत: केलं. मंदिर समितीची यामध्ये स्वत:ची कुठलीही भूमिका नव्हती.

मंदिर समितीने सांगितलं की, दात्याने २००५ मध्ये बद्रिनाथ मंदिराच्या गाभाऱ्यालाही सुवर्णजडित केले होते. मात्र यावेळी एका नियोजनबद्ध कटकारस्थानानुसार आरोप केले जात आहेत. केंद्र आणि राज्य सरकारने केलेल्या प्रयत्नांच्या माध्यमातून केदारनाथ धामचं सौंदर्यीकरण झालं आहे. तसेच येथे येणाऱ्या भाविकांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. ही बाब काही राजकीय तत्त्वांना रुचलेली नाही. दरम्यान, अपप्रचार करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

## इथेनॉल मिश्रित पेट्रोलमध्ये पाणी शोधणारी यंत्रणाच नाही!

### पेट्रोलपंप चालक संघटनांनी केला संताप व्यक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर :**

पावसाचा जोर वाढल्याने धावती वाहने बंद पडण्याचे प्रमाण वाढले आहे. असे का घडते, याचा शोध घेतला असता वाहनाच्या इंधन टाकीत पाणी शिरल्याचे समोर येत आहे. पेट्रोलपंपावर इथेनॉल मिश्रित पेट्रोलमध्ये पाणी शोधणारी यंत्रणाच नसल्यामुळे असे घडत आहे. यंत्रणा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पेट्रोलियम कंपन्यांची आहे. परंतु, त्यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याने पेट्रोलपंप चालक संघटनांनी संताप व्यक्त केला आहे.

केंद्र व राज्य शासनाने पेट्रोलमध्ये १५ टक्के इथेनॉलला परवानगी दिली आहे. या इथेनॉल मिश्रित पेट्रोलमध्ये थोडेही पाणी गेल्यास इथेनॉलवर प्रक्रिया होऊन ते सडते व त्यामुळे पेट्रोलपंप चालकांचे मोठे नुकसान होत, असे विदर्भ पेट्रोलियम डिलर्स असोसिएशनचे म्हणणे आहे.पेट्रोलपंपावरील इंधनाच्या टाकीत पाणी गेले असेल तर एक विशिष्ट रसायन असलेली पेस्ट टाकल्यावर ती गुलाबी होते. परंतु, इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या टाकीत पाणी शिरल्यास पेस्ट गुलाबी होत नाही. त्यामुळे टाकीत पाणी असल्याचे पेट्रोलपंप चालकांना कळत नाही.



मुंबईत काही पंपांवर अशी नवीन यंत्रणा उपलब्ध आहे ज्याद्वारे इथेनॉल मिश्रित पेट्रोलच्या टाकीत पाणी असल्यास लगेच कळते. परंतु, ही यंत्रणा राज्यातील इतर भागात उपलब्ध नाही.

पेट्रोलियम कंपन्यांनी पावसाळ्यापूर्वी सर्व पेट्रोलपंपातील इंधन टाक्यांची तपासणी करायला हवी. परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे इंधन टाकीत पाणी शिरल्यास पंप चालकांचे नुकसान होते. तेच पाणीमिश्रित पेट्रोल ग्राहकांच्या वाहनात गेल्यास ते संतापतात. त्यामुळे पेट्रोलियम कंपन्यांनी अद्ययावत यंत्रणा उपलब्ध करून द्यायला हवी. -अमित गुप्ता, अध्यक्ष, विदर्भ पेट्रोलियम डिलर्स असोसिएशन.

**महाराष्ट्रात पेट्रोल पंप किती?**

केंद्रिय पेट्रोलियम मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, १ जानेवारी २०२२ पर्यंत उत्तर प्रदेशामध्ये देशातील सर्वाधिक म्हणजे ९ हजार ९४२ पेट्रोल पंप कार्यरत आहेत. तर महाराष्ट्र ७ हजार ४६८ पेट्रोल पंपांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. तामिळनाडूमध्ये ६ हजार ६५१ पेट्रोल पंप, राजस्थानमध्ये ५ हजार ८७१ पेट्रोल पंप, कर्नाटकमध्ये ५ हजार ७८४ पेट्रोल पंप आहे.

## संपादकीय ......

# अतिउत्साह नकोच!

चालू आर्थिक वर्षात वित्तीय तुटीचे उद्दिष्ट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या, म्हणजेच जीडीपीच्या ४.९ टक्के मर्यादेत राखले जाईल आणि आगामी २०२५-२६ या वर्षात ही तूट ४.५ टक्क्यांवर आणण्याचे सरकारचे उद्दिष्ट असेल, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे. गेल्या चार वर्षांत ही तूट १.८ टक्क्याने घटवली आहे. कोरोना काळाचा अपवाद करता, कमालीच्या वित्तीय शिस्तीचे पालन केले गेले आहे. भांडवली खर्चांमधून कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण होतात आणि असा खर्च हा उत्पादक स्वरूपाचा असतो. यात अर्थमंत्र्यांनी लक्षणीय वाढ केली. असे असूनही खर्च मर्यादित ठेवण्यात त्यांना यश आले. चालू आर्थिक वर्षात निव्वळ कर्ज ११.६३ लाख कोटी रुपये असणार आहे. त्या तुलनेत सरकारचे निव्वळ कर उत्पन्न २५.८३ लाख कोटी रुपये राहील, असा अंदाज आहे. त्याचवेळी एकूण खर्च ४८ लाख कोटी रुपये असणार आहे.

गेल्या आर्थिक वर्षात तूट ५.८ टक्के होती. सरकारचा खर्च आणि उत्पन्नातील फरक म्हणजे वित्तीय तूट. आता ती ०.९ टक्क्याने कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या २ लाख कोटी रुपये लाभांशामुळे वित्तीय तूट नियंत्रणात राखण्यास सरकारला मदत झाली, हेसुद्धा नाकारता येणार नाही. शिवाय सरकारने लक्षणीय करवसुली करून, तिजोरी भरभक्कम केल्यामुळे केंद्र सरकारला कर्जाचे उद्दिष्ट कमी करणे शक्य झाले; मात्र देशाच्या एकूण आर्थिक स्थितीगतीचा आणि मर्यादांचा विचार न करता, आपल्याला काय मिळाले व आपण काय गमावले, एवढाच आणि मुख्यतः विचार शेअर बाजार करत असतो. त्यामुळे संसदेत अर्थमंत्र्यांनी रोखे उलाढाल कर, म्हणजेच 'एसटीटी' (सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स) वाढीची घोषणा केल्याबरोबर सेन्सेक्समध्ये १२०० अंशापर्यंत घसरण झाली. तो ७९ हजार २२४ या सत्रातील निर्देशांकापर्यंत घसरला; परंतु त्यानंतर दुपारच्या सत्रात सेन्सेक्स पुन्हा ८० हजार ४२९ या पातळीवर स्थिरावला.

सीमाशुल्क कपात आणि काही करसवलतींमुळे ग्राहकोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रातील समभागांना मागणी होती. मुळात आर्थिक पाहणी अहवालात विकास, गती अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत मंदावण्याची शक्यता वर्तवल्यामुळे अर्थसंकल्पापूर्वीच सेन्सेक्समध्ये १०२ अंशांची घसरण झाली. त्यात निर्देशांकात सर्वाधिक योगदान राखणार्या रिलायन्स इंडस्ट्रिजचे निकाल निराशाजनक राहिल्याने बाजारात अनुत्साह होता. अर्थसंकल्प अनुकूल असण्याचा शेअर बाजाराचा अंदाज होता; पण तरीही अनेक समभागांचे भाव अगोदरपासूनच फुगल्यामुळे ते घसरणेही स्वाभाविक होते. मुळात फ्युचर आणि ऑप्शन ट्रेडिंग हे धोकादायक असल्याचा निष्कर्ष आर्थिक पाहणी अहवालात सार्थपणे काढला गेला आहे. त्यामुळे 'एसटीटी' वाढणे अपेक्षितच होते. तसेच दीर्घकालीन भांडवली नफ्यावरचा कर १० वरून १२.५ टक्के, तर अल्पकालीन भांडवली नफ्यावरील कर १५ वरून २० टक्क्यांवर गेला आहे. या कराच्या करवतीमुळे गुंतवणूकदार नाराज होऊ नयेत म्हणून त्या बदल्यात दीर्घकालीन भांडवली नफ्याच्या करमुक्ततेचे प्रमाण सुमारे २५ हजारांनी वाढवून सव्वा लाख रुपयांवर नेले आहे; परंतु या सर्वांमुळे शेअर बाजारात नैराश्य पसरले आहे; मात्र बड्या दलालांना अथवा गुंतवणूक पेढ्यांना काय वाटते, यापेक्षा गरज आहे ती सर्वसामान्य गुंतवणूकदारांच्या हिताची चिंता करण्याची.

वास्तविक बँकांमधील अथवा पोस्टातील ठेवींपेक्षा शेअर बाजारातील म्युच्युअल फंडांमार्फत होणारी गुंतवणूक अथवा थेट गुंतवणूक ही अधिक नफा मिळवून देणारी असते. त्यामुळे तत्त्वतः या बाजारात पैसे गुंतवणार्यांची संख्या वाढण्यास विरोध दर्शवण्याचे कारण नाही. याबद्दल पाहणी अहवालात काळजी व्यक्त केली आहे. 'सेबी'नेही वायदे बाजारात व्यवहार करणारे ९० टक्के गुंतवणूकदार नफा मिळवण्यात अपयशी ठरत असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. ते अधिक गंभीर आणि जोखमीचे आहे. महागाईत रोजच भर पडत असल्यामुळे, या परिस्थितीला तोंड देण्यासाठी शेअर बाजारात पैसे टाकून खटाखट पैसे मिळवावेत, असा मोह अनेकांना होतो; परंतु अनेकदा चढ्या भावात समभाग घ्यायचे आणि मग भाव घसरू लागल्यावर घाबरून ते तोट्यात विकून टाकायचे, असेही प्रकार होतात. 'डे ट्रेडिंग' किंवा अन्य स्वरूपाचे सट्टा व्यवहार करणार्यांची संख्याही कमी नाही. आजकाल समभागांची ऑनलाईन खरेदी-विक्री सहज शक्य झाली आहे. शेअर दलालाकडे दलालीची विशिष्ट रक्कम आगाऊ भरून ठेवली की, दलालीच्या दरात बरीच सूट मिळते. यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण गुंतवणूकदारवर्ग या मार्गाकडे वळला आहे.सीडीएसएल आणि एनएसडीएल या डिपॉझिटरींकडील डीमॅट खात्यांची संख्या चालू आर्थिक वर्षातच सुमारे ११ कोटींवरून १५ कोटींवर गेली.आधुनिक वित्त तंत्रज्ञान, नवकल्पना आणि डिजिटायझेशनच्या आधारे प्रगतीसाठी लागणार्या भांडवलाची उभारणी या बाजारातून केली जाते; परंतु त्याचवेळी शेअर बाजारातील जोखमींचाही विचार करून सावधपणे गुंतवणूक करण्याची गरज असते. यावेळी लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या आदल्या दिवशी अनेक गुंतवणूकदारांनी प्रचंड गुंतवणूक केली. एक्झिट पोलच्या अंदाजांमुळे ते भारावून गेले होते. प्रत्यक्ष निकालाच्या दिवशी मात्र हे अंदाज पुरते कोसळून शेअर बाजाराने आपटी खाल्ली आणि त्यात गुंतवणूकदारांच्या तीस लाख कोटी रुपयांच्या संपत्तीचे नुकसान झाले. धोका सहन करण्याइतकी आर्थिक क्षमता नसेल, तर अशा नुकसानीमुळे अनेक घरे उद्ध्वस्त होतात. त्यामुळे खोट्या दाव्यांना फसून, अभ्यास न करता शेअर बाजारात उतरणे जोखमीचेच.




## मुलांमधील अस्थमाची लक्षणे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती-** बालदमा असलेल्या मुलांमध्ये श्वसनमार्ग आणि फुफ्फुसे ही अतिसंवेदनशील असतात. त्यामुळे हवेतील धूलिकण किंवा सर्दी झाली, तर त्याचा लगेचच त्रास होतो. काही मुलांमध्ये ही लक्षणे तीव्र असतात. त्यांना अस्थमाचा अ‍ॅटॅक येऊ शकतो.

अस्थमा हा मुलांमधील ए एक गंभीर आजार मानला जातो. लहानपणी अनेक मुलांना बाळदमा असतो. त्याशिवाय अनेक गोष्टींचा परिस्थितीचा परिणाम म्हणून अस्थमाचा त्रास वाढू शकतो. जसे इसब, परागज्वर किंवा हे फीव्हर तसेच काही आहाराचे संसर्ग. मुलांमधील अस्थमाची अगदी काही साधी लक्षणे आहेत.

जसे खोकला, छातीत घरघर होणे. खोकला हा अस्थमाचाच असेल असेही नाही काही वेळा ते फक्त लक्षण असते. जेव्हा खोकला हे निव्वळ लक्षण असेल, तर त्याला कोरड्या खोकल्याचा अस्थमा असे म्हणतात. त्यात फक्त कोरडा खोकला येतो; मात्र कफ पडत नाही. व्हिजिंग किंवा छातीत आवाज होतो तो श्वसनमार्ग कफामुळे संकुचित झाल्याने श्वसनाचा आवाज असतो.

**मुलांच्या अस्थमाची इतरही काही लक्षणे दिसतात-** सतत व्हिजिंग, खोकला किंवा श्वसनात अडथळा, झोप लागण्यास त्रास होतो.

खोकला किंवा सर्दी खूप जास्त असल्यास सर्दी किंवा फ्लू होतो.

श्वसनसंस्थेला संसर्ग झाल्यास ब्रॉन्कायटिस होतो किंवा संपूर्ण बरे होण्यास कालावधी जातो.

श्वसनाला त्रास होत असल्याने खेळणे किंवा व्यायाम करण्यावर बंधने येतात.

शांत झोप नसल्याने किंवा अपुर्‍या झोपेमुळे थकवा येतो. मुलांच्या अस्थमाचे निदान हे वैद्यकीय तपासणीनंतरच होते. पण, सर्वसाधारणपणे काही मुलांना आनुवंशिक अस्थम्याचा त्रास होतो तेव्हा त्यांना खेळताना त्रास होतो, सतत सर्दी असते, श्वसनमार्गात संसर्ग होतो.स्थमा आहे की नाही हे



कळण्यासाठी सुरुवातीला जी औषधे दिली जातात त्याचा योग्य परिणाम झाल्यास अस्थमा असल्याचे निदान योग्य असल्याचे समजते.

वरील कोणतीही लक्षणे सतत दिसत असल्यास, आपल्या मुलाला वैद्यकीय सल्ला आणि तपासणीसाठी डॉक्टरांकडे न्यावे. यावर जितक्या लवकर उपचार केले जातील, तितकीच नियमित दिसणारी लक्षणे आटोक्यात ठेवता येतील. त्याशिवाय अस्थमाचा येणारा अ‍ॅटॅकही रोखता येईल. अस्थमाच्या कारकांना अटकाव करणे, योग्य आणि वेळच्या वेळी औषधे घेणे, लक्षणांवर नजर ठेवणे, यामुळे मुलांमधील अस्थमाला थोडा अटकाव करता येतो.

# तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा

## - जिल्हाधिकारी सौरभ कटियार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती-** तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थाच्या अतिवापरामुळे मौखिक कर्करोगाचे प्रमाण युवकांमध्ये वाढत असून त्यामुळे सामाजिक आणि कौटुंबिक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. याला प्रतिबंध घालण्यासाठी जनसामान्यामध्ये जनजागृती करुन तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.जिल्हा सामान्य रुग्णालय व मराठवाडा ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमातर्गत तंबाखू मुक्ती प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन नियोजन भवन येथे करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, प्र. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रीती मोरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद नेवाळे, जिल्हा रुग्णालयाचे डेंटल सर्जन डॉ. अभिजीत वानखेडे, डॉ. मंगेश गुजर, राज्य प्रशिक्षक अभिजीत संगई, मराठवाडा ग्रामीण विकास संस्थाचे प्रकल्प अधिकारी डॉ. निकिता गायकवाड आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले की, तंबाखू सेवनामुळे होणारे परिणाम अत्यंत दूरगामी असल्यामुळे कोट्पा क्टची प्रभावी अंमलबजावणी करणे सर्व विभागांची जबाबदारी आहे. यासाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये व्यापक प्रसिद्धी करावी. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणे व तंबाखूजन्य पदार्थ विकणाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही करावी. सर्व शासकीय कार्यालयात कोट्पा क्टची प्रभावी अंमलबजावणी होत आहे, याची कार्यालय प्रमुखानी खात्री करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. प्रस्तावना प्रकल्प अधिकारी डॉ. निकिता गायकवाड तर सुत्रसंचालन अनिल गुंजे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्या साठी मानसशास्त्र तज्ज्ञ उद्धव जुकरे,पवन दारोकर, गणेश उगले, प्रदीप तांदळे यांनी परिश्रम घेतले.

# खोडमाशी व चक्रभुंगा यांपासून सोयाबीनला वाचविण्याचे सोपे उपाय

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती-**

सोयाबीनचे कमी उत्पादन येण्यामागील विविध कारणापैकी पिकावर होणारा विविध किडींचा प्रादुर्भाव हे एक महत्वाचे कारण आहे. सोयाबीन पिकाचे खोड पोखरणाऱ्या, पाने खाणाऱ्या आणि शेंगातील दाणे खाणाऱ्या किडींच्या प्रादुर्भावामुळे नुकसान होते. खोड पोखरणाऱ्या किडींमध्ये खोड माशी आणि चक्रभूंग्याच्या प्रादुर्भावामुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे या किडींचे वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

**१) खोडमाशी:**

वातावरणातील जास्त आर्द्रता, उबदार तापमान, रिमझिम पाउस आणि त्यानंतर पडणारा पावसातील खंड खोडमाशीच्या प्रादुर्भावासाठी पोषक असतो. खोडमाशीचा प्रादुर्भाव बी उगवणीपासून १०-१५ दिवसांनी रोपावस्थेत सुरू होतो व तो पुढे पीक कापणीपर्यंत राहतो. वातावरण पोषक असल्यास कधीकधी तर ९० ते १०० टक्के झाडे कीडग्रस्त दिसून येतात. त्यामुळे उत्पादनात जवळपास ३० ते ६० टक्क्यांपर्यंत घट येते.

प्रौढ खोडमाशी घरातील माशीपेक्षा लहान आकाराची आणि चमकदार काळ्या रंगाची असते.

मादी माशी पानांच्या पेशीत फिक्कट पिवळसर अंडी घालते. अंड्यातून ४ दिवसात बिनपायाची पिवळसर रंगाची अळी बाहेर पडते. अळी तोंडाकडून टोकदार तर मागील बाजूस गोलाकार असते.

अळी पान पोखरुन पानाच्या शिरेमधून देठात शिरते. देठातून खोडात शिरुन आतील भाग खाते. खोड पोखरत जमिनीपर्यंत पोहोचते. पोखराल्यामुळे खोडात नागमोडी पोकळ्या तयार होतात आणि असे खोड आतून लालसर तपकिरी रंगाचे दिसते

पूर्ण वाढ झालेली अळी खोडामध्येच कोषावस्थेत जाते. प्रौढ माशीला बाहेर येण्याकरीता जमिनीलगत किंवा मोठ्या झाडावर वरच्या बाजूस अळीने गोलाकार छिद्र केलेले आढळते. कोषावस्था ७ ते १० दिवसांची असते.

**वर्षभरात खोडमाशीच्या ८ ते ९ पिढ्या पूर्ण होतात.**

खोडमाशीच्या प्रादुर्भावामुळे लहान रोपे, पाने आणि फांद्यादेखील सुकतात. रोपावस्थेत प्रादुर्भाव झाल्यास तीन पाने कोमेजून सुकलेली दिसतात.एकरी रोपांची संख्या कमी होते. खोडमाशीग्रस्त झाडाच्या वाढीवर विपरित परिणाम होतो त्यामुळे झाडावरील फुलांची गळ होते आणि शेंगा कमी प्रमाणात लागतात. शेंगामधील दाण्याचे वजन देखील कमी होते त्यामुळे उत्पादनात घट येते.

**२) चक्रभुंगा-** चक्रभूंग्याचा प्रादुर्भाव पेरणीपासून एक महिन्याच्या पुढे सुरु होतो व तो पुढे कापणी पर्यंत सुरूच राहतो.

प्रौढ भुंगा फिकट तपकिरी रंगाचा व ७ ते १० मिमी लांब असतो. समोरच्या पंखांचा अर्धा भाग काळा असतो

प्रौढ मादी देठ, फांदी किंवा खोडावर दोन चक्रकाप तयार करते व त्याच्या मधल्या भागात अंडी घालते. चक्रकापाच्या वरचा भाग त्यामुळे वाळतो. एका ठिकाणी एक अशी जवळपास ७८ अंडी एक मादी घालते.

चक्रभुंग्याची अंडी फिकट पिवळसर आणि लांबट आकाराची असतात. तीन ते चार दिवसात अंडयामधून अळी बाहेर येते.

किडीची अळी तसेच प्रौढ या दोन्ही अवस्था पिकाचे नुकसान करतात. पीक १५ ते २० दिवसांचे असतांना प्रादुर्भाव झाल्यास जास्त नुकसान होते.

चक्रभुंग्याच्या जास्त प्रादुर्भावामुळे शेंगा धरण्याचे प्रमाणात, दाण्याचे संख्येत तसेच वजनात घट येते. पीक काढणीच्या वेळी चक्रकापाच्या ठिकाणी खोड तुटून पडते आणि नुकसान होते.

सोयाबीन शिवाय मूग, उडीद, चवळी, तूर, भुईमूग, मिरची, कारली इत्यादी पिकांवर देखील चक्रभुंग्याचा प्रादुर्भाव होतो. जुलै ते ऑक्टोबर पर्यंत कीड कार्यरत असते. पूर्ण वाढ झालेली चक्रभुंग्याची अळी पुढच्या पावसाळ्यापर्यत (ऑक्टोबर ते जून) झाडाच्या खोडात सुप्तावस्थेत जाते. पहिला पाऊस झाल्यानंतर अनुकूल वातावरणात अळीची सुप्तावस्था संपते आणि ती कोशात जाते. कोषातून प्रौढ भुंगा बाहेर येतो व पिकावर अंडी घालतो. अनुकूल वातावरणात एका वर्षात चक्रभुंग्याचे दोन जीवनक्रम होतात.




खोडमाशी आणि चक्रभुंग्याची आर्थिक नुकसान पातळी

**खोड माशी-** सरासरी १० ते १५ टक्के प्रादुर्भावग्रस्त रोपे

**चक्रभुंगा-** सरासरी १० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे किंवा ३ ते ५ प्रादुर्भावग्रस्त झाडे प्रति मिटर ओळीत

निरिक्षणा अंती किडींच्या संख्येने आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्याचे दिसून आल्यासच रासायनिक किटकनाशकांच्या फवारणीचे उपाय योजावेत.

सोयाबीनवरील खोडमाशी आणि चक्रभुंग्याचे एकात्मिक व्यवस्थापन

१) पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत पीक तणमुक्त ठेवावे.

२) पिकाला नत्र खताची मात्रा शिफारशीप्रमाणेच द्यावी. जास्त नत्र दिल्याने किडीचा प्रादूर्भाव वाढतो.

३) चक्रभुंगाग्रस्त झाडाची पाने, फांद्या यांचा तोडून आतील किडीसह नाश करावा

४) ज्या शेतात खोडमाशीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर होतो अशा ठिकाणी पेरणीपूर्वी थायमेथोक्झाम ३० एफ.एस. १० मिली प्रती किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी या बीजप्रक्रियेमुळे खोडमाशीसोबतच रस शोषक किडींच्याही व्यवस्थापनास मदत होते.

५) पेरणीनंतर १५ दिवसांनी एकरी ४० ते ५० पिवळे चिकट सापळे लावून नियमीतपणे किडींच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे.

६) पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्काची करावी. त्यामुळे प्रादुर्भाव टाळण्यास मदत होते.

७) खोडमाशीने किंवा चक्रभुंग्याने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच

- इथिऑन ५० टक्के प्रवाही ३० मिली किंवा
- क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल १८.५ टक्के एस.सी. ३ मिली किंवा
- थायमेथोक्झाम १२.६० + लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ९.५० झेड सी २.५ मिली किंवा
- क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल ९.३० + लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ४.६० झेड सी ४ मिली यापैकी कोणत्याही एका मिश्र कीटकनाशकाची प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

शिफारस केलेले फवारणीच्या कीडनाशकाचे प्रमाण साध्या पंपासाठी असून पॉवर स्प्रेयरचा वापर करावयाचा झाल्यास पाण्याचे प्रमाण तेच ठेवून किटकनाशकाचे प्रमाण तीनपट करावे. कीटक नाशकाची फवारणी करतांना विषबाधा होणार नाही याची काळजी घ्यावी.

**डॉ. चारुदत्त द. ठिपसे**
विषय विषेषज्ञ (पीक संरक्षण) कृषि विज्ञान केंद्र, अकोला

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा उद्योजक, शासकीय आस्थापनांनी लाभ घ्यावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती** राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळण्याची त्यांची क्षमता वाढविण्यासाठी ३९;मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना३९; २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. यासाठी १२ वी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार, आयटीआय/पदविका ८ हजार आणि पदवीधर/पदव्युत्तर प्रशिक्षणार्थ्यांना १० हजार प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे. या योजनेचा युवकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सहायक संचालक प्राजंली बारस्कर यांनी केले आहे.

शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे ही योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना, उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय आस्थापना, उद्योग, महामंडळ या मध्ये मंजूर पदाच्या ५ टक्के इतके उमेदवार कार्यप्रशिक्षणा साठी घेता येतील. आस्थापना किंवा उद्योग यांनी त्यांच्याकडील कार्यरत मनुष्य बळाची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in वेबपोर्टलवर अचूक दर्शविणे आवश्यक राहील. या योजनेकरिता उमेदवारांची नोंदणी, आस्थापनांची नोंदणी, कार्यप्रशिक्षण व्यवसाय नोंदणी, उपस्थिती नोंदविणे, विद्यावेतन अदा करणे, प्रशिक्षण रुजू व समाप्ती अहवाल, अनुभव प्रमाणपत्र इ. बाबी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. लघु आणि मध्यम व मोठे उद्योग, स्टार्टअप्स, सहकारी संस्था, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ, सामाजिक संस्था आणि विविध आस्थापना इ. यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी विभागाच्या https://rojgar.mahaswayam. gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवावे.

किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्यप्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या कार्यप्रशिक्षण योजनेतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दिले जाईल. प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थींची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना किंवा उद्योग यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. सदर ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थींच्या थेट बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल.या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट देवून सदर योजनेमध्ये सहभागी व्हावे. तसेच आपल्या कडील मंजूर मनुष्यबळाच्या संख्येच्या तुलनेत जिल्ह्यातील उमेदवारांना कार्य प्रशिक्षणाची संधी देवून त्यांना रोजगारक्षम होण्यास सहकार्य करावे. अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजक मार्गदर्शन केंद्र, शासकिय तांत्रिक विदयालय परिसर, उस्मानिया मस्जिद जवळ, बस स्टॅण्ड रोड, अमरावती येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २७ जुलै २०२४

शहर/ग्रामिण


# शहरात जनावरे सोडतांना,पाळतांना पोलीस- मनपाची परवानगी लागणार

## परवाने न काढल्यास जनावरे पकडून ताब्यात घेत संबंधितांवर गुन्हे

### मनपा आयुक्त, जिल्हा दूधव्यवसाय विकासअधिकारी, वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** शहरात जनावरे सोडत असताना वाहतूक पोलीस तथा संबंधित पोलीस स्टेशन यांची आता परवानगी घ्यावी लागणार आहे. जनावरे पाळणे संबंधी जिल्हा दूध व्यवसाय विकास अधिकारी परवाने देताना महानगरपालिकेची ना हरकत घ्यावीलागेल. जनावरे पाळणे संबंधी परवाने काढलेले नसल्यास जनावरे मोकाट स्वरूपात समजून महानगरपालिकेच्या पथकाद्वारे जप्त करण्यात येतील तर संबंधित पशु मालकावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश बैठकीत मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिले.महानगरपालिका



आयुक्त यांच्या अध्यक्षतेमध्ये जनावरे पाळणे संबंधी नियमन तसेच सर्व उत्पत्ती नियंत्रण उपक्र याबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये महानगरपालिके मार्फत उपद्रवी व मोका स्वरूपात असलेले जनावरे बंदिस्त करताना येणाऱ्या अडचणी व कायदेशीर बाबी यावर चर्चा करण्यात आली.

यापुढे जनावरे सोडत असताना वाहतूक पोलीस तथा संबंधित पोलीस स्टेशन यांची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच जनावरे पाळणे संबंधी जिल्हा दूध व्यवसाय विकास अधिकारी परवाने देताना महानगरपालिकेची ना हरकत घ्यावी लागेल. जनावरे पाळणे संबंधी परवाने काढलेले नसल्यास जनावरे मोकाट स्वरूपात समजून महानगरपालिकेच्या पथकाद्वारे जप्त करण्यात येतील, असे निर्देश यावेळी बैठकीत आयुक्तांनी दिले.सदर बैठकीस पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा दूध व्यवसाय विकास अधिकारी, वाहतूक पोलीस अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, पोलीस निरीक्षक व्हीएस आलेवार, समाधान वाटोळे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन गाडगे नगर, वाहतूक पोलीस पोलीस निरीक्षक उईके, अधिकारीहजर होते. जनावरे पाळणे संबंधी नियम पाळूनच जनावरे यांचे पालन करावे जेणेकरून उपद्रवी पशुपालनामुळे नागरिक लहान मुले यांचे जीवित हानी व अपघात होणार नाही, या सर्व बाबीवर उपयोजना करण्यासंबंधी विविध विभागास आयुक्त यांनी निर्देशित केले.

# युवतीची इमारतीवरून उडी घेऊन आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** , अकरा मजली इमारतीच्या गच्चावरून उडी घेवून अल्पवयीन युवतीने आत्महत्या केल्याची खळबळजनक घटनाशुक्रवारी (ता.२६) सायंकाळी साडेसात वाजताचे सुमारास नया सातुर्णा येथे घडली. हर्षीता (१७, साईनगर, अमरावती) असे मृतक युवतीचे नाव आहे. अमरावती-बडनेरा मार्गावरील तापडीया मॉलच्यामागील बाजूस असणाऱ्या नया सातुर्णा परिसरात ड्रिम्स प्राईड अपार्टमेंट आहे. याच अपार्टमेंटमध्ये राजापेठ विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त जयदत्त भंवर वास्तव्यास आहे. त्यांचे आरटीपीसी मेश्राम नामक पोलीस कर्मचारी आज अपार्टमेंटच्या खालील बाजूस उभे होते. सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास इमारतीच्या गच्चावरून अचानक एक युवती खाली कोसळल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ जयदत्त भंवर यांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर युवतीला तात्काळ जिल्हा सामान्य रूग्णालयात हलविले. परंतु डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.





घटनेची माहिती राजापेठ पोलिसांना मिळताच त्यांच्यासह डिसीपी गणेश शिंदे यांच्यासह संपूर्ण वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांच्या संशयावरून सदर युवती घटनास्थळी यापूर्वी आली असून, तिने अपार्टमेंटची रेकी केली. जेव्हा तिल सदर घटनास्थळ आत्महत्येसाठी योग्य वाटले तेव्हाच तिने हे पाऊल उचलले. गच्चीवर युवतीचा मोबाईव आढळून आला. त्यावरून तिची ओळख पटविण्या आली. युवतीच्या वडीलांचे साईनगर येथे दुकान आहे आत्महत्या करणारी युवती ही घरून दुचाक निघाली होती. दूध आणण्यासाठी ती घराबाहेर पड असल्याची माहीती पुढे आली



आहे. युवतीच आत्महत्येचे कारण अद्याप पुढे आलेले नाही राजापेठ पोलीस प्रकरणाचा तपास करीत आहेत. घटनेमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली पंधरा दिवसाअंगोदर पोतदार शाळेतील मुलीसुध्दा एका बिल्डींगवर आत्महत्या करण्याकरिता चढल्या होत्या. सुदैवाने पोलिसांनी त्यांना शोधले. वाढत असलेल्या अशा पालकांची चिंता वाढविणाऱ्या आहेत.

# महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवाव्यात-कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते

## विद्यापीठात प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिका-यांची सभा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती** सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या विद्यार्थी हितार्थ असलेल्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचाव्यात, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी प्राचार्य, विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या शुक्रवारी झालेल्या संयुक्त सभेत केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने विद्यापीठ परिसरातीलच दृकश्राव्य सभागृहात प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांची संयुक्त सभा आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर विद्यार्थी विकास मंडळाचे अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. सावन देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निखिल नलोडे, अकोला जिल्हा समन्वयक डॉ. नेत्रा मानकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते पुढे म्हणाले, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी बारा योजना आहेत. योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना झाला पाहिजे, त्यासाठीची प्रक्रिया विद्यापीठाने ऑनलाईन पध्दतीने पोर्टलव्दारे महाविद्यालयांना उपलब्ध करुन दिलेली असून महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे योजनेचे अर्ज पोर्टलव्दारे विद्यापीठाकडे सादर करावेत. ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना योजनांची माहिती करुन देऊन त्यांना त्यांचा लाभ मिळवून द्यावा, जेणेकरुन असे विद्यार्थी विकासाच्या प्रवाहात येतील, एवढेच नाही, तर योजनांचे उद्दिष्ट सुध्दा यशस्वी होईल. अनेक पुरस्कारही विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येतात, त्याचीही माहिती विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी करुन द्यावी, जेणेकरुन विद्यार्थी त्यादृष्टीने परिश्रम करतील, असेही




कुलगुरू म्हणाले.

विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना, विद्यार्थीनी बस पास सवलत, शुध्द पेयजल, शिक्षण संरक्षण, विद्याधन, विद्यार्थी विकास निधी, शिष्यवृत्ती, कौशल्य विकास, सायकल, विद्यार्थी सुरक्षा, स्व. रामप्रकाश शामलाल राठी स्मृति शिष्यवृत्ती, विद्यापीठ दायित्व निधी/ महाविद्यालय दायित्व निधी आणि विविध पुरस्कार योजनेमध्ये असलेले आदर्श विद्यार्थी पुरस्कार, बेस्ट एन.सी.सी. कॅडेट, उत्कृष्ट कलावंत उत्कृष्ट विद्यार्थी, विद्यार्थीनी पुरस्कार अशा विविध योजनांची माहिती दिली. तव्दतच विद्यापीठ कायद्यानुसार विद्यार्थी विकास कक्ष, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण,समान संधी कक्ष, संगीत कला आणि सांस्कृतिक कक्ष, प्लेसमेंट असे कक्ष महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांमध्ये सुरू करणे आवश्यक असल्याचे सांगून या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असे स्पष्ट केले. तर आशीष देशपांडे यांनी विद्यार्थी विकास विभागाकडून सुरू करण्यात आलेल्या पोर्टल आणि त्याव्दारे ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालयांनी काय प्रक्रिया करावी, याची माहिती दिली. यावेळी प्राचार्य तसेच विकास अधिका-यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले व सूचनांवर अंमलबजावणी देखील करण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी स्पष्ट केले.संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व विद्यापीठ गीताने सभेची सुरुवात करण्यात आली. सभेच्या आयोजनामागील भूमिका डॉ. राजीव बोरकर यांनी स्पष्ट केली. सूत्रसंचालन व आभार डॉ. अभिजित इंगळे यांनी मानले. सभेला विद्यापीठातील विविध प्राधिकारिणींचे सदस्य, विद्यापीठ अंतर्गत येणा-या पाचही जिल्हांमधील महाविद्यालयांचे प्राचार्य, महाविद्यालयांचे विद्यार्थी विकास अधिकारी, शिक्षक मोठए संख्येने उपस्थित होते.

# कोंडेश्वर परिसरातील वीटभट्ट्यावर चालला गजराज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** - अमरावती बडनेरा शहरापासून दूर असलेल्या कोंडेश्वर मार्गावरील अलियाबाद येथील सर्व्हे नं. ९/१ ची जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आरक्षित करण्यात आली आहे. त्या महाविद्यालयाकरिता परिसरातील सर्व वीटभट्ट्या आणि एक कारखाना पूर्णपणे जमीनदोस्त करण्यात आला. महसूल विभाग, पोलिस आणि महापालिका प्रशासनाकडून ही संयुक्त कारवाई करण्यात आली. या वीटभट्ट्या हटवल्यानंतर वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या मजुरांच्या २५ झोपड्या जमीनदोस्त करण्यात आल्या. प्रशासनाच्या या कारवाईमुळे वीटभट्टी मालकांचे लाखो रुपयांचे नुकसान



झाले आहे.कोंडेश्वर रोडवर असलेल्याअलियाबाद येथील सर्वे नंबर ९/१ येथील २५ एकर जमीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आरक्षित करण्यात आली आहे. याई-क्लास जमिनीवर गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून वीटभट्टीचा व्यवसाय करणाऱ्या चालकांना प्रशासनाच्या वतीने ८ ते १० वेळा जागा रिकामी करण्याच्या नोटिसा देण्यात आल्या. मात्र या सर्व वीटभट्टी चालकांनी न्यायालयात अपील केली. नुकतीच त्यांची याचिका न्यायालयाने फेटाळल्यानंतर त्यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात अपील दाखल केली होती. मात्र या मुद्यावर २९ जुलै रोजी सुनावणी होणार होती. यापूर्वीही महसूल विभागाने पोलीस प्रशासन आणि मनपा अतिक्रमण विभागाच्या मदतीने शासकिय महाविद्यालयासाठी आरक्षित असलेली अलियाबादची जागा रिकामी करण्याची प्रक्रिया सुरू केली.या २५ एकर जागेत ८ वीटभट्ट्या होत्या. याशिवाय अलिबादमध्ये सिमेंट फ्रेम आणि वॉल कंपाऊंड बनवण्याचा कारखानाही आहे. या वीटभट्ट्यांवर मेळघाट येथील आदिवासी मजूर काम करीत असल्याने त्यांच्या २५ ते ३० झोपड्या होत्या. त्यासुद्धा तोडण्याची कारवाई प्रशासनाच्या वतीने करण्यात आली. कारवाईत महसूल विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी, पटवारी, मंडल अधिकारी यांचा सहभाग होता. तहसीलदार विनय लोखंडे, नायब तहसीलवार टीना चव्हाण, मंडळ अधिकारीसंगीता जोगी, पटवारी गोपाल लांजेवार, महापालिका अतिक्रमण विभागाचे प्रमुख श्याम चौरे यांच्यासह मोठा पोलीस ताफा उपस्थित होता.-

# भिल्ली येथे शेळीच्या गोठ्याला आगआगीत ३८ शेळ्या जळून मृत ; १६ शेळ्या गंभीर जखमी

## पाच लाखाचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७धामणगाव रेल्वे-** तालुक्यातील भिल्ली येथील शेळीच्या गोठ्याला आग लागल्यामुळे या आगीत ३८ शेळ्या जळून मृत पावल्या असून १६ शेळ्या गंभीर जखमी झाले आहे.सदर घटना गुरुवारला (ता.२५) रात्रीच्या सुमारास घडली.यामुळे जगदेव सदाशिवराव काळमेघ या पशुपालकाचे जवळपास ५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार असे की,तालुक्यातील भिली येथील जगदेव सदाशिवराव काळमेघ यांच्याकडे ५४ शेळ्या होत्या.नेहमी प्रमाणे शेळ्या चारून आणल्यानंतर त्या गोठ्यात ठेवण्यात आल्या.परंतु गुरुवारला (ता.२५) रात्रीच्या सुमारासगोठ्यला आग लागली.या आगीत ५४




पैकी ३८ शेळ्या होरपळून मृत पावल्या असून १६ शेळ्या गंभीर जखमी झाले आहे.दरम्यान या आगीवर नियंत्रण मिळविण्याचा गावकऱ्यांनी प्रयत्न केला.परंतु गोठा हा कुडाचा असल्याने आगीवर नियंत्रण मिळविता आले नाही.यामुळे जगदेव काळमेघ या पशुपालकाचे जवळपास ५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.ऐन पावसाळ्यात आग गोठ्यातील वीज प्रवाहामुळे लागली असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.शासनाने नुकसान भरपाई द्यावी,अशी मागणी जगदेव काळमेघ यांनी केली आहे.

# ग्रामपंचायतच्या सेतू केंद्राच्या कक्षाला सरपंचानी ठोकले कुलुप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मोर्शी-** मोर्शी तालुक्यातील राजुरवाडी ग्रामपंचायत सरपंच यांनी अचानक ग्रामपंचायतच्या सेतू केंद्राच्या कक्षाच्या कुलूप ठोकल्याने खळबळ उडाली आहे. सेतू केंद्र चालकाने गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, तर सरपंचांनी लाडकी बहीण व अन्य योजनांचे फार्म भरण्यासाठी गावातील लोकांनकडून अवाजवी पैसे घेत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नागरीकांकडून तक्रार



आल्याने त्यावर आम्ही गटविकास अधिकारी, तहसीलदार मोर्शी यांच्याकडे तक्रार केली असून पत्र देऊन जनतेची होणारी आर्थिक लूट थांबविण्यासाठी कुलुप लावण्याचे कार्य केले असून नागरीकांची गैरसोय पाहता दुसऱ्या सेतू संचालकाची मागणी सुद्धा प्रशासनाकडे केली आहे. ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या वतीने आपले सहकार सेवा केंद्र (सेतू) जनतेच्या सुवेधिसाठीव व विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी लाख रुपयांचा निधी खर्च करून गावातच तहसीलचे दाखले मिळण्याची उत्तम सोय शासनाच्या वतीने करण्यात आली आहे तसेच नुकतेच लाडकी बहीण योजना व विविध योजनांचे आवेदन ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सोय व जबाबदारी सुध्दा शासनाच्या वतीने आपले सहकार सेवा केंद्र संचालक यांच्यांकडे सोपविण्यात आली आहे. राजुरवाडी येथील आपले सहकार सेवा केंद्राच्या कक्षाला ग्रामपचायत सरपंच पल्लवी अभिजित मानकर यांनी कुलूप ठोकले.

### गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार

पाच वाजताच्या दरम्यान मी कामानिमित्त बाहेर गेलो असता सरपंच यांनी कुलूप ठोकले. या प्रकरणाची गटविकास अधिकारी मोर्शी यांच्याकडे तक्रार केली आहे. सरपंच यांच्यावर कायदेशीर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी अशी मागणीही केली आहे.

**- मंगेश राऊत, सेतू केंद्र संचालक**

### नागरिकांची आर्थिक पिळवणूक

आपले सेवा केंद्र संचालक हा लाडकी बहीण योजना तसेच अन्य योजनांचे फार्म भरण्यासाठी महिलांसह इतर नागरीकांकडून शंभर दोनशे रुपये अतिरिक्त प्रतेक फॉर्मचे घेत असून नागरिकांनी याबाबत माझ्याकडे तक्रार केली. यावर गटविकास अधिकारी तसेच तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यावर चौकशी सुरू आहे. यामधे अनेक महिलांनी बयान नोंदवीले असून सर्व सामान्य जनतेची आर्थिक लूट थांबविण्यासाठी मी प्रशासनाकडे दुसरे सेतू केंद्र संचालकाची मागणी केली आहे. दुसरा व्यक्ती येईपर्यंत सेतू केंद्राला कुलूप ठोकले. जेणेकरून मंगेश राऊत यांनी नागरीकांची आर्थिक पिळवणूक करु नये. **- पल्लवी अभिजित मानकर, सरपंच**

# २ला कावड यात्रेच्या नियोजनाबाबत बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अकोला,**श्रावण महिन्यातील कावड व पालखी उत्सवाच्या मिरवणूक मार्ग, सुव्यवस्था आदी नियोजनाबाबत जिल्हा दंडाधिकारी अजित कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक नियोजनभवनात दि. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.श्रावणाला दि. ५ ऑगस्टपासून सुरूवात होणार असून, या काळात अकोला जिल्ह्यात शहरी, तसेच ग्रामीण भागात कावड व पालखी उत्सव साजरा करण्यात येतो. या कालावधीत भाविक गांधीग्राम येथील पूर्णेच्या पात्राजवळ मोठ्या संख्येने एकत्र येतात व कावड जलाने भरून श्री राजराजेश्वर मंदिरात महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करतात. या उत्सवाच्या अनुषंगाने शहरात आपातापा नाका, रेल्वे पूल, शिवाजी महाविद्यालय, अकोट स्टँड, मामा बेकरी, बियाणी चौक, कापड बाजार, सराफा लाईन, गांधी चौक, कोतवाली चौक, लोखंडी पूल, काळा मारोती वळण, जयहिंद चौक ते राजराजेश्वर मंदिरापर्यंत कायदा व सुव्यवस्था, बंदोबस्त तसेच इतर आपत्कालीन सोयीसुविधा पुरविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने बैठकीत चर्चा होणार आहे.

# पॅरिस ऑलिम्पिकची रंगतदार सुरुवात

## ४ तासांच्या सोहळ्यात सिंधू-अचंता यांनी केले भारताचे नेतृत्व

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७पॅरिस –** जगाचे लक्ष लागून राहिलेल्या २०२४ पॅरिस ऑलिम्पिक क्रीडोत्सावाला पॅरिस येथे सुरुवात झाली. नेहमीच्या ऑलिम्पिक स्पर्धेच्या परंपरेला छेद देत पहिल्यांदाच स्टेडियमऐवजी नदीच्या पात्रात हा उद्घाटन सोहळा पार पडला. सुमारे चार तास पॅरिस ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा चालला. ९५ बोटींतून ६,५०० हून अधिक खेळाडूंनी यामध्ये भाग घेतला. भारताचे ध्वज वाहक पीव्ही सिंधू आणि अंचता शरत कमल होते. उद्घाटन समारंभात भारतीय दलातील ७८ खेळाडू सहभागी झाले होते. परेडमध्ये सहभागी झालेल्या देशांमध्ये भारत ८४ व्या क्रमांकावर होता.

शनिवारी होणाऱ्या कार्यक्रमामुळे भारतीय संघातील अनेक खेळाडूंनी उद्घाटन सोहळ्यात सहभाग घेतला नाही. ध्वजवाहक सिंधू आणि शरथ कमल व्यतिरिक्त, इतर महत्त्वाच्या खेळाडूंमध्ये तिरंदाज दीपिका कुमारी, बॉक्सर लोव्हलिना बोरगोहेन, टेबल टेनिसपटू मनिका बत्रा आणि टेनिसपटू रोहन बोपण्णा उद्घाटन समारंभात होते. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या उद्घाटन सोहळ्याने अधिकृतपणे सुरुवात झाली.




फ्रान्सची सर्वात प्रसिद्ध ट्रॅक थलीट मेरी-जोस पेरेक आणि तीन वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती ज्युडोका टेडी रिनर यांनी शुक्रवारी पॅरिस ऑलिम्पिकची मशाल संयुक्तपणे प्रज्वलित केली.

ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा मैदानाबाहेर आयोजित करण्याची ही पहिलीच वेळ होती. चार तास चाललेल्या या सोहळ्यात अनेक कलाकारांनी भाग घेतला. पॉप स्टार लेडी गागा, अया नाकामुका यांसारखे सुपरस्टार परफॉर्म करताना दिसले. त्याच वेळी, सहा किलोमीटर लांबीच्या परेड ऑफ नेशन्समध्ये २०६ देशांतील ६५०० हून अधिक खेळाडूंनी ९४ बोटींमध्ये भाग घेतला.

### पहिल्या दिवसाचे भारताचे वेळापत्रक

**बॅडमिंटन-**

संध्याकाळी ७.१० वाजता – पुरुष एकेरी गट सामना: लक्ष्य सेन विरुद्ध केविन कॉर्डन (ग्वाटेमाला)

रात्री ८ वाजता – पुरुष दुहेरी गट सामना: सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी विरुद्ध लुकास कॉर्वे आणि रोनन लाबर (फ्रान्स)

रात्री ११:५० – महिला दुहेरी गट सामना: अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्टो विरुद्ध किम सो येओंग आणि काँग ही योंग (कोरिया)

**बॉक्सिंग-**

दुपारी १२:०५ – महिला ५४ किलो प्राथमिक फेरीचा सामना: प्रीती पवार विरुद्ध थी किम आन्ह वो (व्हिएतनाम)

**हॉकी-**

रात्री ९ वाजता- पूल ब सामना: भारत विरुद्ध न्यूझीलंड

**नौकानयन-** दुपारी १२:३० – पुरुष एकेरी स्कल्स: पनवर बलराज

**टेबल टेनिस-**

७:१५ – पुरुष एकेरी पहिली फेरी: हरमीत देसाई विरुद्ध जैद अबो (येमेन)

**टेनिस-**

०३:३० – पुरुष दुहेरीची पहिली फेरी सामना: रोहन बोपण्णा आणि एन श्रीराम बालाजी विरुद्ध एडवर्ड रॉजर-व्हॅसेलिन आणि फॅबियन रेबोल (फ्रान्स)

**शूटिंग-**

दुपारी १२:३० – १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक पात्रता: संदीप सिंग / इलावेनिल वालारिवन

दुपारी १२:३० – १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक पात्रता: अर्जुन बबुता / रमिता जिंदाल

दुपारी २ – १० मीटर एअर पिस्तूल पुरुष पात्रता: अर्जुन सिंग चीमा

दुपारी २ – १० मीटर एअर पिस्तूल पुरुष पात्रता: सरबज्योत सिंग

दुपारी ४ – १० मीटर एअर पिस्तूल महिला पात्रता: मनू भाकर

दुपारी ४ – १० मीटर एअर पिस्तूल महिला पात्रता: रिदम सांगवान

## ग्रामसेवक पदाच्या परीक्षेसाठी

# पूर्व विदर्भातील परीक्षार्थींना थेट पश्चिम महाराष्ट्रात परीक्षा केंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७चंद्रपूर:** जिल्हा परिषद अंतर्गत वेगवेगळ्या पदासाठी ऑक्टोबर २०२३ मध्ये ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. २९ जुलैला आयबीपीएस मार्फत ग्रामसेवक पदासाठी परीक्षा घेण्यात येत असून ऑनलाईन अर्ज करताना तीन परीक्षा केंद्रांचे पर्याय आहेत. परंतु, त्याला पूर्णपणे बगल देत पूर्व विदर्भातील परीक्षार्थींना शेकडो किलोमीटर दूरवर असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात परीक्षा केंद्र दिल्याने परीक्षा घेणाऱ्या एजन्सीविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.




जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या वेगवेगळ्या पदासाठी ऑक्टोबर २०२३ मध्ये ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. एकीकडे राज्यात मुसळधार पाऊस आहे. वाहतूक व्यवस्था खोळंबल्याने दळणवळणाची समस्या निर्माण झाली आहे. दुसरीकडे गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर या जवळपासच्या परीक्षा केंद्रांचे तीन पर्याय निवडले असताना शेकडो किलोमीटर अंतरावर असलेले परीक्षा केंद्र दिल्याने परीक्षार्थींना प्रवासाच्या शारीरिक त्रासासह आर्थिक फटका बसणार आहे.कालपर्यंत सुरू असलेल्या आरोग्य सेवक परीक्षेसाठी उमेदवारांनी निवडलेल्या तीन केंद्रांपैकी कुठलेही केंद्र न देता लांबचे केंद्र देण्यात आले होते. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडाराच्या विद्यार्थ्यांना चक्क औरंगाबाद, धुळे, नाशिक, नांदेड, लातूर आणि तिकडल्या विद्यार्थ्यांना नागपूर, चंद्रपूर अशा दूरवरच्या ठिकाणी पाठवण्यात आले होते. याचीच पुनरावृत्ती परत एकदा झाली असून त्याच एजन्सीकडून गडचिरोली, भंडारा चंद्रपूर व गोंदियाच्या विद्यार्थांना परत एकदा लातूर, औरंगाबाद, धुळे, नाशिक, नांदेड येथील प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

आधीच विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करताना शासनाला ९००/- ते १०००/- रू शुल्क दिले आहे. मागील अनेक वर्षांपासून बेकारीचा सामना करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांची शासन आणखी किती परीक्षा घेणारा असा प्रश्न विचारला जात आहे.फक्त नोकरभरतीची जाहिरात काढून शासनाची भूमिका संपत नाही तर ज्यासाठी एवढे शुल्क घेतले जाते त्या परीक्षेसाठी संबंधित एजन्सी व्यवस्थित परीक्षा घेते किंवा नाही, हेसुद्धा बघणे गरजेचे आहे. परीक्षा केंद्राच्या चुकीच्या नियोजनामुळे की गरीब विद्यार्थ्यांनी आर्थिक अडचणींमुळे परीक्षा देऊ नये म्हणून मुद्दाम हे सर्व केले जात आहे का, हा चौकशीचा विषय आहे. यासंदर्भात ग्राम विकास मंत्रालयाने लक्ष घालून उमेदवारांनी निवड केलेल्या तीन केंद्रांपैकी एक केंद्र त्यांना देण्यात यावे, अशी मागणी विद्यार्थी आणि पालक यांनी केली आहे.

# क्रांतीदिना निमित्त्य महाराष्ट्रवादी चले जाव चा होणार जयघोष

## विराआंस समिती फडविणार नागपूर विधानभवनावर स्वतंत्र विदर्भाचा झेंडा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** गेल्या ११९ वर्षापासून स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण व्हावे, यासाठी विविध व्यासपीठावर मागणी करून आणि बारा वर्षापासून सतत अनेक जनआंदोलने करून विदर्भ राज्य आंदोलन समितीने विदर्भ राज्याची मागणी तीव्र केली आहे. आता विदर्भ राज्य आंदोलन समिती दिनांक १० ऑगस्ट २०२४ ला (९ ऑगस्टच्या क्रांतीदिनानिमीत्य ) नागपूर येथील विधानभवनावर स्वतंत्र विदर्भ राज्याचा ध्वज फडकवणार आहे. या आंदोलनापूर्वी समितीचे कार्यकर्ते यशवंत स्टेडियम येथे १० ऑगस्ट ला दुपारी १२ वाजता एकत्र येणार असून त्यानंतर समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते विधानभवन ( संविधान चौक) पर्यंत लांगमार्च द्वारे जाऊन विधानभवनावर स्वतंत्र विदर्भ राज्याचा ध्वज फडकविणारअसल्याची माहिती विराआंस छे अध्यक्ष वामनराव चटप यांनी दिली.

केंद्रात सत्तारूढ असलेल्या भाजप सह अनेक पक्षांनी विरोधी पक्षात असतांना स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी झालेल्या आंदोलनात तर सहभाग घेतला, मात्र सत्तेवर येताच स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण करण्याऐवजी वैदर्भिय जनतेच्या तोंडाला पाने पुसली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत आपले वचन न पाळलेल्या केंद्रात व राज्यात सत्तारुढ असलेल्या भारतीय जनता पक्ष व त्यांच्या मित्रपक्षाला विदर्भातील जनतेने विदर्भातील लोकांची दिशाभूल केल्याबद्दल जरब बसविली आहे आता सरकारने स्वतंत्र विदर्भ राज्य दिले नाही तर आगामी काळात विधानसभा निवडणूकीत विदर्भातील जनता याचे चोख उत्तर देणार आहेत.या अनुषंगाने स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसाठी आणि विदर्भातील नागरिकांवरील अन्याय संपविण्याच्या दृष्टीने नव्या केंद्र सरकार ला इशारा देण्यासाठी महाराष्ट्रवादी चले जाओ चा नारा देत समिती पुन्हा रणशिंग फुंकणार आहे. कुठल्याही परिस्थितीत १० ऑगस्ट २०२४ ला विदर्भ राज्य आंदोलन समितीने नागपूर येथे विधानभवनावर स्वतंत्र विदर्भ राज्याचा झंडा फडकविणारचं असा निर्धार व्यक्त केला आहे.२०१४ मध्ये सत्तेत येण्यापूर्वी स्वतंत्र विदर्भ राज्याचे लिखित आश्वासन देऊनही आजपर्यंत विदर्भाचे राज्य निर्माण केले नाही, म्हणून बीजेपी ला विदर्भातून हद्दपार व्हावे लागले. तसेच विदर्भात शिवसेना शिंदे गटाचे खाते सुद्धा उघडू शकले नाही. नव्या सरकारने जर विदर्भाचे राज्य त्वरित निर्माण केले नाही तर विदर्भाची जनता भाजपला विदर्भात चारी मुंड्या चीत केल्याशिवाय राहणार नाही. अबकी बार विदर्भ की सरकार चा नारा देत येणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आंदोलन अधिक तीव्र केले जाणार आहे.या आंदोलना दरम्यान केंद्र सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी, अन्नधान्यावरील जीएसटी तात्काळ रद्द करण्यात यावी, अतिवृष्टीने झालेल्या पिक नुकसानीची भरपाई तात्काळ देण्यात यावी, साप चावून मरणाऱ्या व्यक्तीस इतर वन्यजीवा प्रमाणेच मदत मिळावी, राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे पिक विमाधारक शेतकऱ्यांना तात्काळ पिकविम्याची मदत देण्यात यावी, विदर्भात स्मार्ट प्रीपेड मीटर कुठेही लावू नये या ज्वलंत मागण्या करण्यात येणार आहेत. आष्टी ते सुरजागड कांक्रीट रस्ता बांधकाम ला राज्य सरकारने त्वरित मंजुरी प्रदान करून निधी उपलब्ध करण्यात यावी, बल्लारशहा सुरजागड रेल्वे मार्गास केंद्र सरकारने तात्काळ मंजुरी प्रदान करून निधी उपलब्ध करून द्यावा अशीही मागणी समितीने केली आहे. या आंदोलनात संपूर्ण विदर्भातील जनतेने मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन विदर्भ राज्य आंदोलन समितीने केले आहे.



# 'लाडकी बहीण' ला दादांच्या खात्याचा आक्षेप; योजनेवर चिंता केली व्यक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ मुंबई :-** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरून नवा वाद सुरू झाला आहे. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात ही योजना जाहीर केली असली तरी अर्थखात्यानेच त्यावर आक्षेप घेतला होता, ही बाब आता समोर आली आहे. राज्यभर या योजनेसाठी महिला अर्ज भरत असताना आता महायुतीमध्ये यावरून वादाची ठिणगी पडली आहे.

राज्यावर आधीच भरमसाठ कर्ज असताना या योजनेसाठी वर्षाला ४६,००० कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. त्यामुळे राज्यावरील कर्जाचा बोजा ८ लाख कोटी रुपयांच्या आसपास पोचेल, याकडे लक्ष वेधत ही योजना आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याचे अर्थ विभागाचे म्हणणे होते. परंतु निवडणुका जिंकायच्या असतील तर वैयक्तिक लाभांच्या योजनांची गरज आहे. मध्य प्रदेश सरकारचा अनुभव लक्षात घेता ही योजना वरदायिनी ठरेल. त्यामुळे कसल्याही परिस्थितीत या योजनेची अंमलबजावणी करायचीच असे महायुतीमधील वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत ठरले. त्यामुळे अर्थ खात्याच्या या आक्षेपाकडे दुर्लक्ष करीत लाडकी बहीण योजनेची घोषणा करावी लागली.



योजनेच्या सुलभ अंमलबजावणीसाठी गठित केलेल्या अशासकीय सदस्यांच्या तालुका आणि वॉर्डस्तरीय समितीऐवजी विधानसभा क्षेत्रनिहाय समितीकडे अधिकार देण्यात आले आहेत. तालुका आणि वॉर्डस्तरीय समिती प्राप्त अर्जांची छानणी करून ती जिल्हाधिकाऱ्यांना सादर करेल. त्यानंतर ती यादी विधानसभा मतदारसंघनिहाय समितीकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे.

या समितीत असलेल्या दोन अशासकीय सदस्य आणि अध्यक्ष निवडीचे अधिकार पालकमंत्र्यांना देण्यात आले आहेत, तर शासकीय सदस्य नियुक्तीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

अशासकीय सदस्य या समितीचा अध्यक्ष असेल, त्यामुळे सत्ताधारी पक्षांना आपल्या सोयीच्या सदस्याला अध्यक्षपद देणे शक्य होणार आहे.

# 'आरटीई' चे चार दिवसांमध्ये ३९० प्रवेश – निश्चित; प्रवेशासाठी ५ दिवस शिल्लक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–**

आरटीई प्रवेशाला सुरुवात झाली असून, चार दिवसांत केवळ ३१० प्रवेश निश्चित झाले आहेत. अद्यापही २ हजार जागांवर प्रवेश शिल्लकआहेत. प्रवेशाकरीता मात्र शेवटचे पाच दिवस शिल्लक राहीले आहेत. ज्या पालकांना प्रवेशाबाबतचा संदेश प्राप्त झाला आहे.त्यांच्या अर्जाची समितीच्या वतीने पडताळणी केली जात आहे.तब्बल दोन ते अडीच महीने न्यायप्रविष्टराहीलेल्या आरटीई प्रवेश प्रक्रियेला जुलैपासून सुरूवात करण्यात आले. जिल्ह्यात




२३४ शाळांमध्ये २३०० जागांसाठी अर्ज मागविण्यात आले होते. याकरीता ६ हजार ६२६ बालकांचे अर्ज प्राप्त झाले. मागील वर्षीच्या तुलनेत मात्रयावर्षी अर्जाची संख्या देखील घटली.

प्राप्त अर्जाची लॉटरी काढली असून, पहिल्या टप्यात २३०० बालकांच्या नावांची यादी प्रसिद्ध केली असून, प्रवेशाबाबत पालकांना संदेश दिले आहेत. तसेच २३०० बालकांची प्रतीक्षा यादी तयार केली आहे. परंतु, पहिल्या यादीतील प्रवेशानंतरच प्रतिक्षा यादीतील प्रवेश स्वीकारले जाणार आहे. या पडताळणीनंतरच समितीच्या शिफारशीने संबंधित शाळांमध्ये प्रवेश निश्चित करता येईल, या चार दिवसांत ३१० बालकांचे प्रवेश निश्चित करण्यात आले आहे. प्रवेशाला ३१ जुलैची डेडलाईन असल्याने या पाच दिवसांत किती प्रवेश निश्चित होतात, याकडे लक्ष लागले आहे.याला मुदतवाढ मिळण्याची देखील शक्यता वर्तवली जात आहे.

# जिल्ह्यामध्ये ४८२ गावे ओडीएफ प्लस

## ४५ रखडलेली कामे सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शौचालय बांधकाम, सांडपाणी व्यवस्थापन व इतर स्वच्छता संदर्भातील कामे केली जात असताना या विभागाचे उद्दिष्ट असलेल्या ओडिएफ प्लस मॉडल गावांना पूर्ण करण्यासाठी ३१ सप्टेंबरची डेडलाईन देण्यात आली आहे.तत्पूर्वी जिल्ह्यात ४८२ गावे ओडीएफ प्लस मॉडलच्या अंतिम टप्यात आली आहे. याशिवाय ४५ गावांमध्ये सांडपाणी घनकचरा




व्यवस्थापन प्रकल्पाची रखडलेली कामे अधिक गतीने होईल. याकडे जिल्हा परिषद प्रशासन कामाला लागले आहेत. त्यासाठी सूचना ही शासन स्तरावरून देण्यात आल्या आहेत.जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत हागणदारी मुक्त गाव, ओडीएफ, ओडीएफ प्लसनंतर आता ओडिएफ प्लस मॉडल गाव करण्याचे उद्दिष्ट जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छ विभागाला देण्यात आले. यंदा १ हजार ६१५ गावे मॉडल गाव करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. मॉडल गाव करण्याकरीता गावस्तरावर सोकपिट, कंम्पोस्ट पिट, कचरा संकलन व विलगीकरण केंद्र, घंटागाडी आदी सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. ही कामे ग्रामपंचायतीला १५ व्या वित्त आयोगातुन करणे अपेक्षित होते. परंतु, ती कामे न ओडिएफ प्लस मॉडल होण्यास अडचणी येत आहेत. अशी ४८२ गावांमधील ही कामे रखडली होती. याशिवाय वैयक्तिक शौचालय, सार्वजनिक शौचालय, ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावातील सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची कामे देखील रखडली होती. ही सर्व कामे तातडीने सुरु करण्यात आले आहे.ओडिएफ प्लस मॉडल गावे आता अंतिम टप्यात आली आहे. माहे सप्टेंबर पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावी, असे सक्त निर्देशही पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिवांनी सीईओंना दिले आहे.

# पावसामुळे मेळघाटातील नागरिकांचा प्रवास झाला खडतर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७चिखलदरा–** मागील आठवडाभरापासून सतत पाऊस सुरू असल्यामुळे मेळघाटातील जंगल परिसरात प्रत्येक रस्ते खराब झाले आहेत. याबरोबरच काही गावांमध्ये जाणार्या रस्त्यांवर पूल छोटे असल्यामुळे फुलांवरून पाणी वाहत आहे. त्यामुळे या पुलांवरून प्रवास करणे धोकादायक असून नागरिक जीव धोक्यात घालून प्रवास करीत आहे.

चिखलदरा तालुक्यातील कारंजखेडा या गावाजवळ अतिशय छोटा पूल आहे. या पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे प्रवास करणे कठीण झाले आहे. तरीही नागरिक या पुलावरून मोटरसायकल व चार चाकी गाड्या काढत आहेत. परिणामी नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. यासह अनेक ठिकाणचे रस्ते खराब झाले आहेत. या ठिकाणी वाहने चालवणे कठीण झाले आहे. सततच्या पावसामुळे चाळीस गावातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांना नदी व नाल्याच्या पुरातून रस्ता काढावा लागत आहे. दरवर्षी पावसाळ्यात मेळघाटातील रस्त्यांचा प्रश्न उपस्थित होतो; परंतु पावसाळा संपला की, प्रशासन या



समस्यांकडे लक्ष देत नाही, ही गंभीर बाब असून मेळघाटातील सामान्य नागरिक व आदिवासी बांधवांना किमान चांगले रस्ते, चांगल्या दर्जाचे पूल मिळावेत, अशी अपेक्षा केल्या जात आहे.याबाबत बोलताना हतरू येथील उपसरपंच भैयालाल मावस्कर म्हणाले की, कारंजखेडा गावाजवळ एक पूल असून तो अतिशय छोटा आहे. या पुलावरून पाणी सतत वाहते. मागील आठ तासापासून गावातील नागरिक बाहेर पडले नाहीत. हा पूल दुरुस्त केला नाही तर आंदोलन केले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

# गोदाम बांधा, साडेबारा लाखांचे अनुदान मिळवा

## बांधकाम खर्चाच्या पन्नास टक्के मिळणार अनुदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २७ अमरावती**

राष्ट्रीय अन्न व पोषण अभियान (कडधान्य) आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत चालू आर्थिक वर्षापासून शेतकरी उत्पादक संघ किंवा कंपनीस २७० मेट्रिक टन साठवणूक क्षमता असलेल्या गोदाम उभारणीसाठी केंद्र शासनाकडून गोदाम बांधकाम करण्यासाठी पन्नास टक्के खर्च : अथवा साडेबारा लाख रुपये इतके अनुदान दिले जाणार आहे. मात्र, ही अनुदान योजना बँकेशी निगडित असल्याने गरजवंत शेतकरी उत्पादक कंपनी: अथवा संघाने या योजनेचा लाभ घेण्यासाठी कृषी विभागाकडे अर्ज करावा लागणार आहे.

योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपनी - संघाने अर्ज करताना वखार महामंडळाच्या निकषाची पूर्तता करावी लागणार आहे. यामध्ये खर्चाचे अंदाजपत्रक, बांधकाम किती कालावधीत पूर्ण करणार यासंबंधी माहिती, बांधकामाचा आराखडा (नकाशा), अशा विविध निकषांची पूर्तता करावी लागणार आहे.

तसेच गोदाम कशासाठी वापरले जाणार, कोणत्या धान्याची साठवणूककेली जाणार, शेतकऱ्यांच्या उत्पादित मालास किती दर आकारला जाणार, ही माहिती देणेदेखील बंधनकारक असणार आहे. ज्या शेतकरी उत्पादकसंघ किंवा कंपनीने निकषांची पूर्तता केली, त्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात थेट अनुदान जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. या योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### साडेबारा लाखांपर्यंत अनुदान

शेतकरी उत्पादक संघ किंवा कंपनीस शासनाच्या निकषाची पूर्तता केल्यास अनुदानाची साडेबारा लाख रुपये किंवा गोदाम बांधकामाच्या पन्नास टक्के रक्कम त्यांच्या खात्यावर जमा होणार आहे.

### कागदपत्रे काय लागतात?

योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना सातबारा लाख अनुदान मिळवि- ण्यासाठी आधारकार्ड, बँक खात्याचा तपशील ही कागदपत्रे संबंधित तालुका कृषी अधिकारी तसेच मंडळ अधिकारी याच्याकडे जमा करावी लागणार आहेत.

### अर्ज कोठे करायचा?

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या तालुका कृषी अधिकारी, मंडळ अधिकाऱ्यांकडे किवा जिल्हा कृषी अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावा लागणार आहे.

# दर्यापूर बसस्थानकाला आले तलावाचे स्वरूप

## बस स्थानक परिसरात सापांचे साम्राज्य जीव मुठीत धरून प्रवासी करतात प्रवास





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ दर्यापूर**

मागील कित्येक महिन्यांपासून दर्यापूर बसस्थानकांतील अस्वच्छता व आगार परिसरातील रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. तसेच ठिकठिकाणचे खड्डे पडलेले आहे त्यामुळे आगार परिसरात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात जमा होते.परिणामी दर्यापूर आगाराला सध्या तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे एवढेच नाही या पाण्यात आता साप सुद्धा निघू लागले आहे त्यामुळे चालक ,वाहक आणि प्रवासी यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे

दर्यापूर बसस्थानकांतील अस्वच्छता व आगार परिसरातील रस्त्याची सध्या दयनीय अवस्था झाली आहे बस स्थानकाकत मोठ मोठे गड्डे व त्या गड्ड्यात जमा झालेले पाणी यामुळे सध्या प्रवासी हेरान झालेले आहेत यासंदर्भात आगार व्यवस्थापकांना वारंवार सूचना देऊनसुद्धा स्वच्छता व मोठमोठ्या खड्ड्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही.

प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही तर बसस्थानकांतील खड्ड्यांमुळे बसचालक व प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामना करावा लागत आहे. भविष्यात याठिकाणी अप्रिय घटना सुद्धा घडू शकते. संपूर्ण परिसरात स्वच्छता करण्यात यावी. खड्डे बुजविण्यात यावे अश्या मागणीचे पत्र आगार व्यवस्थापकासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुद्धा पाठविण्यात आले आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही एस टी कामगार संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# उपमुख्यमंत्र्यांनी मागितला धरणग्रस्तांचा अहवाल

## धरणग्रस्तांची संख्या व जमिनीची माहिती घेणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७वरूड**

मोर्शी येथील अप्पर वर्धा धरणग्रस्त कृती समितीच्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अमोल महल्ले यांनी शुक्रवार, १९ जुलै रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथील सागर बंगल्यावर भेट घेत अप्परवर्धा धरणग्रस्त शेतकर्यांच्या मागण्या संदर्भात चर्चा केली. चर्चा झाल्यानंतर धरणग्रस्त शेतकर्यांची संख्या त्यांच्या जमिनीच्या माहितीचा संपूर्ण अहवाल उपमुख्यमंत्र्यांनी राज्याचे सचिव दीपक कपूर यांना मागितला आहे. त्यामुळे धरणग्रस्तांच्या बरेच वर्षापासूनच्या मागण्यांवर तोडगा निघण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

उपमुख्यमंत्र्यांशी बोलताना अमोल महल्ले म्हणाले की, अप्पर वर्धा धरणाला ४४ वर्षे पूर्ण झाले. त्यावेळी सरकारने धरणग्रस्त कुटुंबातील एक किंवा दोन सदस्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, फक्त ४० टक्के लोकांनाच सेवेत सामावून घेतले गेले आहे. भूसंपादन करतेवेळी अधिकार्यांनी चुका केल्या होत्या. त्यानंतर सुधारणा करण्यात आल्यावर त्यावेळी करण्यात आलेल्या शिफारसींची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. पुनर्वसन कायद्याप्रमाणे पुनर्वसित गावापासून आठ किलोमीटरचे परिघात जमीन उपलब्ध करून देण्याची तरतूद असताना ५० ते ६० किलोमीटर अंतरावर जमिनी देण्यात आल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची आरक्षण मर्यादा केवळ ५ टक्के असून ती १५ टक्के व्हायला पाहिजे. ज्यांना नौकरी करायची नाही किंवा ज्यांना तशी इच्छा नाही, त्यांना २५ ते ३० लाख रुपये सानुग्रह अनुदान मिळायला हवे, असे सर्व मुद्दे उपमुख्यमंत्र्याजवळ महल्ले यांनी मांडले. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्याचे सचिव दीपक कपूर यांना अप्पर वर्धा धरणग्रस्त शेतकर्यांची संख्या व जमिनीचा अहवाल मंगळवारपर्यंत सादर करण्याचे आदेश दिले आहे व लवकरच उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करून त्यानंतर मागण्याचे निवारण करू, आश्वासनही दिले आहे.

# राजस्व अभियान अंतर्गत शासनाच्या ३५ स्टॉलवरुन विविध योजनेचा २५७०० लाभार्थ्यांनां प्रत्यक्ष लाभ

## अभियानाचे आ. रवी राणा यांनी केले उद्घाटन : उप विभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार, शासकिय योजना यंत्रणा प्रमुख यांची उपस्थिति






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शासनाच्या योजनेचा लाभ सर्व पात्र लाभार्थ्यांना मिळावा या हेतूने महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाचा कार्यक्रम महाराजस्व अभियान हा आहे. गोर गरीब नागरीकांना, सर्व सामान्य लोकांना शासकीय योजनेचा लाभ एकाच छताखाली मिळावा यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उप मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस ,अजित दादा पवार ,महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील व शासनाचे मंत्री त्यांचें कडील योजना राबवित आहेत. हया सर्व योजनेचा लाभ आमदार रवी राणा यांच्या बडनेरा मतदार संघाचे लोकांना मिळावा यासाठी वरील मंत्री महोदयांच्या आदेशान्वये व सहकार्याने तसेच राज्यसभा सदस्य अनिल बोंडे यांच्या सहकार्याने जिल्हाधिकारी अमरावती यांच्या आदेशानुसार आज अमरावती नवीन तहसील कार्यालय येथे राजस्व अभियान - जनता दरबाराचे आयोजन केले होते .या जनता दरबाराचे उद्घाटन आमदार रवी राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत उप विभागीय अधिकारी अनिल भटकर,तहसीलदार विजय लोखंडे, नायब तहसीलदार रासेकर ,टीना राठोड ,संजय गांधी तहसीलदार , व ३५स्टॉल वरील सर्व योजना राबविनारे अधिकारि यांचे उपस्थितीत राजस्व अभियान जनता दरबार आयोजित केला होता. १४ हजार लाभार्थ्यांना विविध प्रकारच्या शासकिय योजना अंतर्गत वैयक्तिक व सामाजिक लाभ देण्यात आला.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत १४०००फॉर्म भरले,

मुख्यमंत्री व कार्य परीक्षेन योजना८००, लाडकी लेक योजना ,महात्मा फुले जन आरोग्य योजना ७००,आयुष्यमान भारत योजना , अन्न सुरक्षा कार्ड पुरवठा योजना४९०,अटल पेन्शन योजना, अन्नपुरवठा योजना३०० ,संजय गांधी व श्रावणबाळ योजना, नैसर्गिक आपत्तीचे वाटप एकूण ३०००,जात प्रमाणपत्र वाटप ४०००,आधार कार्ड वाटप९०० ,भुमिअभिलेख सनद वाटप ४८९०,कृषी विभाग अंतर्गत १०लाभार्थ्यांना ट्रॅक्टर चे वाटप ,करण्यात आले यामध्येशांताराम श्रावण खांडेकर,राजेंद्र शिवशंकर ठाकरे, गोविंदा पिसे, अमोल की संगमने, भास्कर गणेश चव्हाण ,दुमास पदलकर,नितेश रामचंद्र अवश्य कर,श्रीकृष्ण रामकृष्ण मरसकोल्हे, विनोद जागृती बंडाबुचे,आत्माराम कृष्णाजी खडसे, उमेश साखरे, ज्योत्स्ना मंगेश इंगोले, माधुरी इंगोले यांना आमदार रवी राणा यांनी ट्रॅक्टर वाटप केले.पी.आर कार्ड_सनद वाटप करण्यात आले एकूण १२०००. अनेक योजनेचे अंतर्गत १५००लोकांना चेक चे वाटप करण्यात आले.यावेळी बडनेरा मतदारसंघ अंतर्गत गावचे सरपंच ,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य ,सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य व युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम शासनाच्या महत्वकांक्षी कार्यक्रम असल्याने शासन अनेक योजना राबवत असून एकाच छताखाली सर्व योजनेचा लाभ गोरगरीब लोकांना मिळावा हा शासनाचा उद्देश असल्याचे उद्घाटक आमदार रवी राणा यांनी सांगितले. मोठया हजारोच्या संख्येने सहभागी होत वरील योजनेचा लाभ मोठया प्रमाणात लोकांनी घेतला यासाठी सर्व उपस्थीत अधिकाऱ्यांचे आभार मानले. यशस्वी कार्यक्रम आयोजित केला त्या बद्दल समाधान व्यक्त केले.

# शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना 'संदेस' ॲप कामकाजात वापरणे अनिवार्य



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शासकीय कामकाज अधिक सुरक्षायुक्त करण्याचा निर्धार महाराष्ट्र शासनाने केला आहे. शासन ते शासन आणि शासन ते नागरिक अशा पातळीवरील संदेशवहनासाठी ॲप देण्याचा विचार सुरू होता. त्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने एक परिपत्रक काढून माहिती दिली. 'संदेस' हे ॲप शासनाने पुरस्कृत केले आहे. पत्रकात त्याची माहिती स्पष्ट करण्यात आली.

केंद्र व राज्य शासन, शासकीय कार्यालये व स्थानिक संस्था यात हजारो संदेशाची देवाणघेवाण होत असते. संदेश मजकूर स्वरूपात असले तरी ऑडिओ, व्हिडिओ, नस्ती स्वरूपात पण माहितीचे देवाणघेवाण होते. डिजिटल इंडिया कार्यक्रम अंतर्गत आत्मनिर्भर भारताचा एक उपक्रम म्हणून 'संदेस' ॲप उपयुक्त आहे. मुक्त स्रोत आधारित, सुरक्षित आणि स्वदेशी इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्म देणारी ही प्रणाली आहे. धोरणात्मक नियंत्रण शासनाकडे. सुरक्षा प्रथम हे तत्व. संदेश देणारा व घेणारा यांच्यातच संदेशवहन. ही प्रणाली केवळ संख्यिकीय विश्लेषणासाठी मेटाडेटा संग्रहित करते. म्हणून संदेश पुनरूत्पादित केला जाऊ शकत नाही. वितरित नं झालेले संदेश इन्क्रिपटेड स्वरूपात केवळ मर्यादित कालावधीसाठी साठवले जातात. गैरवापराची तक्रार झाल्यास त्याचा उगम शोधण्याची क्षमता या ॲपमध्ये आहे. शासकीय कामकाजसाठी इतर कोणत्याही ॲपचा वापर नं करता 'संदेस' या ॲपचा वापर करण्याची बाब बंधनकारक करण्याचे ठरले, असे आदेशात नमूद आहे.

'संदेस' वेब आवृत्तीची उपलब्धता ही व अन्य एकूण १६ वैशिष्ट्ये या संदेस प्रणालीची आहे. या प्रणालीचा वापर केंद्रीय सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच विविध राज्य शासनातील २०० हून अधिक शासकीय संस्था आणि साडेतीनशेपेक्षा अधिक ई - गव्हर्नन्स ॲप ॲप्लिकेशनमध्ये संदेश, ओटीपी व सूचना पाठविण्यासाठी केल्या जात आहे. म्हणून महाराष्ट्र शासनामार्फत सुद्धा शासकीय कामकाजात हे ॲप सर्व विभागानी वापरण्याची सूचना असून त्याचा अंमल आजपासून होणार आहे.




# एमपीएससीमध्येही मोठा घोटाळा? निवड झालेल्यांच्या नोकऱ्या धोक्यात

## ८ उमेदवारांना थेट सोशल मीडियावरूनच आले आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई**



गेल्या काही दिवसांपासून देशासह राज्यभरात आयएएस अधिकारी पूजा खेडकर आणि युपीएससी परीक्षा देताना तिने केलेल्या गैरप्रकारांची चर्चा सुरू आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर स्पर्धा परीक्षा देताना बनावट कागदपत्रे वापरल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहे.

आता विविध परीक्षा देताना निवड झालेल्या अनेक उमेदवारांनी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याच्या तक्रारी आल्या आहेत. यानंतर MPSC ने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या आदेशाने वैद्यकीय आणि दिव्यांग प्रमाणपत्रे वापरलेल्या ८ उमेदवारांना चौकशीसाठी बोलावले आहे.दरम्यान एमपीएससीनेही आपल्या एक्स अकाउंटवर एक पोस्ट केली आहे. ज्यात लिहिले आहे की, राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२२ मधील ८ दिव्यांग उमेदवारांनी त्यांच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीकरिता संबंधित अपिलीय प्राधिकरण कार्यालयात २९ जुलै रोजी सकाळी ११ वा. उपस्थित रहावे.

दरम्यान या पोस्टबरोबर जोडलेल्या पत्रात असे म्हणण्यात आले आहे की, २०२२ मध्ये राज्यसेवेची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ८ दिव्यांग उमेदवारांच्या कागदपत्रांबाबत तक्रारी आल्या आहे. त्यामुळे पुढील कायदेशीर लढाई टाळण्यासाठी आताच त्यांच्या कागदपत्रांची पाडताळणी करावी.

पूजा खेडकर प्रकरण समोर आणणाऱ्या वैभव कोकाट या तरुणानेही नुकतेच या संबंधीत एक पोस्ट केली होती. त्याने पोस्टमध्ये लिहिले आहे की, UPSC प्रमाणेच MPSC मध्येही दिव्यांग प्रमाणपत्रांचा मोठा घोळ झाला असल्याची शक्यता आहे. त्यामुळे मॅटच्या आदेशाने एमपीएससीने निवड झालेल्या ८ उमेदवारांना चौकशीसाठी बोलावले आहे.

# आपले सरकार पोर्टलचे सर्व्हर डाउन विद्यार्थ्यांना मिळेनात प्रमाणपत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**




आरटीई प्रवेश, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रमाणपत्रे काढावी लागत आहेत. मात्र, आपले सरकार पोर्टल व महाऑनलाइनचे सर्व्हर गत २० दिवसांपासून सातत्याने डाउन आहे. याचा फटका विद्यार्थ्यांना बसत आहे.

उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचा दाखला यांसह इतर प्रमाणपत्र प्रलंबित असल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत आहेत. सर्व्हरच्या तक्रारीबाबत प्रशासनाच्या वतीने आयटी विभागाकडे पाठपुरावाही सुरू असल्याची माहिती आहे.

सध्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत सहभागी होण्यासाठी अनेक महिलांनी उत्पन्नाच्या दाखल्यासाठी तर शाळा महाविद्यालय सुरू झाले असल्याने विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल केले आहेत.

तसेच रहिवासी प्रमाणपत्र, इन्कम प्रमाणपत्र, वरिष्ठ नागरिक प्रमाणपत्र, अल्प भूधारक प्रमाणपत्र, तात्पुरते रहिवासी प्रमाणापत्र, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र यासह इतर प्रमाणपत्रांसाठी अर्ज दाखल झाले आहेत. मागील काही दिवसांपासून महाऑनलाइनचे सर्व्हर डाऊन झाल्याने अनेकांना प्रमाणपत्र मिळण्यासाठी अडचणी येत आहे. शासनस्तरावर हे पोर्टल व सर्व्हर सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. अर्जदाराने ऑनलाइन पद्धतीने अर्ज केल्यास तो अर्ज सबमिट होण्यास बराच विलंब लागतो.सर्वसामान्य नागरिक लॉगिन करू शकतात; परंतु त्यांना अर्ज भरताना वारंवार अडचणी येत आहे. बहुतांश वेळा दिवसा सर्व्हरची गती कमी असते. त्यामुळे रात्रीच्या वेळी अर्जाचा भरणा केला जातो. मात्र दिवसाच नव्हे तर रात्रीच्या वेळीसुद्धा हीच अडचण येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी उत्पन्नाच्या प्रमाणपत्रासाठी झुंबड उडाली आहे. त्यामुळे सीएससी चालकांकडे मोठी गर्दी होत आहे. एका केंद्र चालकाचा लॉगिन आयडी आठ ते दहा ठिकाणी एकाच वेळी चालविला जात आहे. त्यामुळे सर्व्हर डाउनची समस्या निर्माण झाली असल्याचे सांगण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांना मिळणार आता मोफत वीज; एप्रिलपासून अंमलबजावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण', 'ज्येष्ठ नागरीकांना मोफत तीर्थयात्रा', अशा लोकप्रिय घोषणेनंतर राज्य शासनाने आता शेतकऱ्यांसाठी 'मुख्यमंत्री बळिराजा मोफत वीज योजना' लागू केली आहे. या योजनेअंतर्गत राज्याती ७.५ एचपी पर्यंतच्या कृषी पंप ग्राहकांना एप्रिलपासून मोफत वीज दिली जाणार आहे. या योजनेचा लाभ राज्यातील ४४ लाख तीन हजार शेतकऱ्यांना मिळणार आहे.

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना या योजनेबाबत घोषणा केली होती. त्याचा शासन आदेश काल (ता. २५) सरकारने काढला आहे. जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यामुळे राज्यातील कृषी व्यवसायावर दुष्परिणाम झाला असून शेतकऱ्यांवर नैसर्गिक आपत्ती ओढवली आहे. यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत आला आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने ७.५ एचपी पर्यंतच्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा आदेश ऊर्जा विभागाचे उपसचिव कराड यांनी काढला.

ही योजना पाच वर्षासाठी असून एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत राबविण्यास सरकारने मान्यता दिली आहे. मात्र तीन वर्षाच्या कालावधीनंतर या योजनेचा आढावा घेऊन पुढील कालावधीत योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. वीज बिल माफ केल्यानंतर वीजदर सवलती पोटी रक्कम शासनाकडून महावितरणला अग्रिम स्वरूपात वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे अधिक वीज बिल माफीनुसार सहा हजार ९८५ कोटी रुपये आणि सात हजार ७७५ कोटी रुपये सवलतीपोटी असे एकूण मिळून १४ हजार ७६० कोटी महावितरणला द्यावे लागणार आहेत.

# कुठे आहे, निर्णय वेगवान, महाराष्ट्र गतिमान? वर्ष पूर्ण, तरी होईना

## 'MPSC'ची संयुक्त पूर्व परीक्षा; आयोगाच्या पत्रव्यवहारानंतरही शासनाकडून ५०० पदांची मागणीपत्रे नाहीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**




गतवर्षी संयुक्त पूर्व परीक्षा गट-ब, गट-क या परीक्षेची जाहिरात फेब्रुवारीत प्रसिद्ध होऊन ३० एप्रिलला परीक्षा झाली होती. मागील परीक्षेला एक वर्षाचा कालावधी लोटला, तरीदेखील यंदाच्या परीक्षेचे वेळापत्रक ठरलेले नाही. लोकसभेची आचारसंहिता संपली, पावसाळी अधिवेशनही पार पडले, तरीसुद्धा राज्य शासनाकडून 'एमपीएससी'ला रिक्त पदांची मागणीपत्रे दिलेली नाहीत.

राज्य शासनाच्या ४३ प्रमुख शासकीय विभागांकडून त्यांच्याकडील रिक्त पदांची मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठविली जातात आणि त्यानुसार आयोग रिक्त पदांची जाहिरात प्रसिद्ध करून परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करते. यात पोलिस उपनिरीक्षक, कर सहायक, राज्य विक्रीकर निरीक्षक, सहायक कक्ष अधिकारी, लिपिक, दुय्यम निबंधक, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, तांत्रिक सहायक अशा पदांचा समावेश असतो. राज्यातील किमान पाच-साडेपाच लाख तरूण-तरूणी दरवर्षी ही परीक्षा देतात.

वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षीच या परीक्षेची उत्सुकता असते. गतवर्षी ३० एप्रिल २०२३ रोजी एकूण आठ हजारांहून अधिक पदांसाठी ही परीक्षा पार पडली होती. किमान सहा महिन्यातून एकदा ही परीक्षा अपेक्षित असतानाही आणि अनेक तरूणांची वयोमर्यादा संपुष्टात येत असताना एक वर्षानंतरही संयुक्त पूर्व परीक्षा कधी होईल, याचे उत्तर ना 'एमपीएससी'कडे ना राज्य शासनाकडे अशी वस्तुस्थिती आहे.

'निर्णय वेगवान, महाराष्ट्र गतिमान' कागदावरच (बोल्ड करून मागे बॉक्स) ३० एप्रिल २०२३ रोजी संयुक्त पूर्व परीक्षा पार पडली होती आणि त्यानंतर जून २०२४मध्ये ही परीक्षा अपेक्षित होती. नात्र, मागील परीक्षेला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरही ही परीक्षा कधी होणार, याचे उत्तर कोणाकडेच नाही, अशी स्थिती आहे. आयोगाने राज्य शासनाला पत्रव्यवहार करून मागणीपत्रे तातडीने पाठवावीत, अशी मागणी केली आहे. तरीपण, अद्याप ५०० हून अधिक पदांची मागणीपत्रे आयोगाला आलेली नाहीत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता १५ सप्टेंबरनंतर जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यावेळी सर्वच शासकीय विभाग निवडणुकीच्या कामात व्यस्त असतात. त्यामुळे निवडणुकीपूर्वी संयुक्त पूर्व परीक्षा न झाल्यास विधानसभा निवडणूक होईपर्यंत परीक्षा शक्य नाही. त्यामुळे शासनाकडून मागणीपत्रे वेळेत यावीत, असे विश्वसनिय सूत्रांनी सांगितले.

# क्यूआर कोड सिस्टीम' कचऱ्यात ! अमरावती महानगरपालिकेचा पैसा पाण्यात;स्कॅनिंग न करताच होतेय कचरा संकलन





**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

लाखोंचा खर्च करून अकोला महानगरपालिकेने घरोघरी कचरा संकलन व्यवस्थित होते की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी 'क्यूआर कोड सिस्टीम' लावली. मात्र, मनपा प्रशासनाच्या अनास्थेमुळे केंद्र शासनाच्या या उपक्रमाचा बोजवारा उडाला आहे. शहरातील घरांवर लावलेल्या क्यूआर कोडचे स्कॅनिंग होत नसल्याने, लाखोंची उधळपट्टी कशासाठी केली? असा प्रश्न सुज्ञ अमरावतीकर विचारत आहेत.

आमच्या भागात कचरा गाडी आली नाही, घंटागाडी दररोज येत नाही, अशा तक्रारींमुळे घंटा गाड्यांवर वॉच ठेवण्यासाठी धरोधरी 'क्यूआर कोड' लावण्यात आले होते. शहरात दैनंदिन तयार होणारा कचरा घंटागाडीच्या माध्यमातून संकलित करून तो डम्पिंग ग्राउंडवर टाकला जातो.

कचरा उठाव करणाऱ्या गाडीचालक किंवा मदतनिसांना घराबाहेर लावलेला क्यूआर कोड स्कॅन करणे बंधनकारक करण्यात आले होते. जेणेकरुन क्यूआर कोडच्या माध्यमातूनच या गाड्यांवर नियंत्रण ठेवता येईल, असा उद्देश या उपक्रमाचा होता.

इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज (आयटीसी) या कंपनीसोबत केलेल्या करारानुसार ही सिस्टीम अमरावती शहरात सुरू करण्यात आली होती. अमरावती शहरातील बहुतांश घरांना क्यूआर कोड स्टीकर लावण्यात आले आहे.मात्र, या योजनेचा पुरता बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. कचरा संकलन करण्यासाठी आलेल्या घंटा गाडी चालकाकडून क्यू आर कोड स्कॅनच केले जात नसल्याचे पाहणीत समोर आले आहे.

ज्या सदनिकेमध्ये कचरा गोळा करण्याची सोय आहे, अशा ठिकाणी सर्वांसाठी एकच क्यूआर कोड देण्यात आला आहे. तर ज्या ठिकाणी नागरिक स्वतः येऊन कचरा टाकत असेल, अशा ठिकाणी त्यांच्या वैयक्तिक ओला आणि सुका कचरा असलेल्या टोपल्यांनाही क्यूआर कोड लावण्यासाठी स्टिकर देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात कचऱ्याचे कोणतेही वर्गीकरण केले जात नाही.

कचरा संकलनासाठी नियुक्त केलेल्या घंटागाडीद्वारे कचरा उचलण्यात येतो कि नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ही सिस्टीम लावण्यात आली होती. मात्र, याची अंमलबजावणी करण्याचा विसर प्रशासनाला पडला आहे. कारण, अंमलबजावणी झाल्यास घंटागाडी चालकांना प्रत्यक्ष घरोघरी जावे लागणार आहे. जे की आता होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांच्या आहेत. त्यामुळे मनपाच्या स्वच्छता विभागाने जाणीवपूर्वक हा उपक्रम गुंडाळल्याच्या शंकेला वाव आहे.

घरांना क्यूआर कोडचे स्टिकर लावून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ लोटला. बऱ्याच घरांवर लावलेले क्यूआर कोडचे स्टिकर आता गायब झाले आहेत. बहुतांश नागरिकांना हे क्यूआर कोड कशासाठी चिटविण्यात आले याचीही माहिती नाही, हे विशेष.

# स्वच्छतेच्या 'रेटिंग'वरून आता ठरणार हॉटेल, रिसॉर्टचा दर्जा !देशभरात ग्रीन लिफ रेटिंग प्रणाली सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

विदर्भाच्या प्रमुख पर्यटन स्थळांवर स्वच्छता आणि स्वच्छता मानके सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने केंद्रीय पाणी व स्वच्छता विभाग आणि पर्यटन मंत्रालयाच्या विद्यमाने देशभरात ग्रीन लिफ रेटिंग प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून पर्यटनस्थळांवरी लहॉटेल्स, रिसॉर्ट्स, होम स्टे, धर्मशाळांमध्ये स्वच्छतेला प्राधान्य देण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. या स्वच्छतेच्या रेटिंगवरूनच संबंधितांचा दर्जा ठरणार आहे.

विदर्भाचा विचार केल्यास विदर्भात हजारो पर्यटक येतात. त्यामध्ये चंद्रपूर,मेळघाट जंगल सफारीसह विविध धार्मिक स्थळांनाही ते भेटी देतात. त्यांना थांबण्यासाठी ग्रामीण भागात रिसॉर्ट, हॉटेल्स, होमस्टे आणि धर्मशाळा यासारख्या अनेक आदरातिथ्य सुविधा आहेत.

ग्रामपंचायतींच्या अधिकार क्षेत्रात राहण्याच्या सुविधा पुरवतात त्या ग्रा.पं.चा स्वच्छतेचा 'ओडीएफ प्लस' दर्जा कायम ठेवण्यासाठी आदरातिथ्य सुविधांच्या चालकांनी पुरेशा पायाभूत सुविधांचा विकास करणे, चांगल्या पद्धतींचा अवलंब करणे तसेच जबाबदार पर्यटनाचा एक भाग म्हणून स्वच्छता आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यास मदत करणे अपेक्षित आहे.



ग्रीन लिफ रेटिंग प्रणालीच्या माध्यमातून सर्व आदरातिथ्य सुविधा केंद्रांमध्ये स्वच्छतेला प्राधान्य देण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. 'ट्रॅव्हल फॉर लाईफ' आणि 'मिशन लाईफ' अंतर्गत पर्यटन क्षेत्रासाठी सदर कार्यक्रमांतर्गत पर्यटक आणि पर्यटन व्यवसायांना शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यास प्रवृत्त करण्याची ही योजना तयार करण्यात आली आहे.ग्रीन लिफ रेटिंग प्रणाली अंतर्गत स्वच्छता, स्वच्छतागृहांची उपलब्धता, ग्रेवाटर व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि कचरा विल्हेवाट लावण्याच्या पद्धती या पाच प्रमुख बाबींवर ही स्वच्छता रेटिंग निश्चित केली जाणार आहे.घनकचरा व्यवस्थापन (सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट) आणि मल गाळ व्यवस्थापनसाठी (फिकल स्लज मॅनेजमेंट) प्रत्येकी ८० गुण आणि राखाडी पाणी व्यवस्थापनसाठी (ग्रेवॉटर मॅनेजमेंट) ४० गुण आहेत. या तीन निकषांवर एकूण २०० गुण देऊन जिल्हा समितीद्वारे मूल्यांकन केले जाईल.

### जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष

'ग्रीन लिफ रेटिंग सिस्टम'साठी जिल्हास्तरीय समितीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी असतील. याशिवाय समितीत जि.प.चे सीईओ, पंचायत विभागाचे डेप्युटी सीईओ राहतील, तर पाणीपुरवठा व स्वच्छता मिशनचे डेप्युटी सीईओ हे सदस्य सचिव असतील.याशिवाय राज्य सरकारचे जिल्हा प्रतिनिधी, पर्यटन विभाग, जिल्हा समन्वयक (एसबीएम ग्रा.), पंचायती राज संस्थांचे प्रतिनिधीही समितीचा भाग असतील, पर्यटन उद्योगातील स्वतंत्र प्रतिनिधींचा समावेश करण्याचा निर्णय अध्यक्ष घेतील. तालुकास्तरावरील उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या अखत्यारित समितीकडून आलेल्या अहवालानुसार रेटिंग देण्याचे काम जिल्हास्तरीय समिती करेल.